# प्रकरण दोन

## चित्रपटांचा विकास : १९१९ ते १९४९

संपूर्ण भारतात कोल्हापूरचे नांव अजरामर करणा-या चित्रपट कलेचा विकास अनेक निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ व कलाकार यांनी आपली बुध्दिमत्ता व अथक परिश्रमाच्या जोरावर घडवून आणला. कोल्हापूरातील चित्रपटाचा विकास कोणकोणत्या टप्प्यातून झाला, हे पाहण्यासाठी येथील चित्रसंस्था, त्यांनी निर्माण केलेले चित्रपट, त्यांची वैशिष्ठे, या सर्व गोष्टींचा आढावा कालक्रमानुसार घेणे आवश्यक आहे. कोल्हापूरात चित्रपट निर्मितीची सुरूवात करून विकासाची दिशा दाखविण्याचे श्रेय श्री. बाबूराव पेंटर यांच्याकडे जाते. अगदी सुरूवातीस सादर झालेले चित्रपट हे मूकपटच असत.

### १९२० च्या दशकातील चित्रपट निर्मिती :

कोल्हापूरात १९१९ ते १९२९ या काळात श्री. बाबूराव पेंटर यांनी स्थापन केलेली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ही एकच चित्रसंस्था चित्रपट निर्मिती करीत होती. पहिल्या चित्रपटासाठी या संस्थेने एका पौराणिक कथेची निवड केली व त्याचे दिग्दर्शन स्वत: बाबूराव पेंटर यांनीच केले.[१] " सैरंध्री " या प्रथम चित्रपटात भूमिका करण्यासाठी त्यांनी बाळासाहेब यादव [ १८९२-१९५१ ], झुंझारराव पवार, बाबूराव पेंढारकर [ १८९६-१९६७ ] व राळजी म्हसकर या पुरूष कलाकारांची व कमलादेवी, गुलाबबाई व अनुसयाबाई या स्त्री कलाकारांची निवड केली.[२]

१९२० ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात महाभारतात पांडवांना अज्ञातवासात जगायला लागणारे अपमानास्पद जीवन व विराट नगरीचा उन्मत्त सेनापती कीचक याचा भीमाने केलेला वध याचे चित्रण केले होते.[३]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने आपल्या पुढील चित्रपटासाठी देखील पौराणिक विषयाचीच निवड केली. १९२१ साली प्रदर्शित झालेल्या " वत्सलाहरण " या बलराम कन्या वत्सलेवरील पौराणिक चित्रपटाचे दिग्दर्शन बाबूराव पेंटरनी केले होते.[४] यात घटोत्कचाची भूमिका करण्यासाठी बाळासाहेब यादव यांची व बलरामाची भूमिका करण्यासाठी म्हसकर मास्तर यांची निवड केली, तर अर्जुनाचे काम चिमासाहेब घोरपडे या सरकारी कारकुनाने केले होते. व्ही. शांताराम व बाबूराव पेंढारकर या दोन मावस भावांची श्रीकृष्ण व लक्ष्मण या भूमिकांसाठी निवड केली. दुर्योधनाचे काम करण्यासाठी निळकंठ बुलबुले या गृहस्थांची निवड केली. वत्सलेची भूमिका गजराबाई यांनी केली. गणपत बकरे या तरुणाची अभिमन्यूच्या भूमिकेसाठी निवड करण्यात आली. वत्सलेच्या भूमिकेस आवश्यक मुलगी मिळणे अवघड झाल्याने रंगनाथ नारायण खटावकर या १२-१३ वर्षाच्या मुलाचीच या भूमिकेसाठी निवड केली गेली.[५]

पहिल्या दोन पौराणिक चित्रपटानंतर बाबूराव पेंटर यांनी " दामाजी " हा संतपट घेण्याचे ठरविले व त्यानुसार १९२२ साली संत दामाजीच्या जीवनावर आधारीत " दामाजी " हा चित्रपट स्वत: पेंटरनी दिग्दर्शित केला.[६]

या चित्रपटातील दामाजी या प्रमुख भूमिकेसाठी म्हसकर मास्तरनी काम केले व दामाजीच्या पत्नीची भूमिका गुलाबबाई या स्त्री कलाकाराने केली होती. श्री. बाळासाहेब यादव यांनी बेदर बादशहाची व बाबूराव पेंढारकर यांनी विठू महाराजाची, तर नानासाहेब सरपोतदार यांनी खलनायकाची भूमिका या चित्रपटात वठविली होती. याच चित्रपटात दुष्काळी माणसांची कामे बाबा गजबर व श्रीपतराव काकडे यांनी केली होती. [७] १९२२ याच वर्षी दामाजी चित्रपटानंतर " मार्कंडेय " हा पौराणिक चित्रपट काढावयाचे बाबूराव पेंटरनी ठरविले. त्यांनी स्वत: दिग्दर्शित केलेल्या या

चित्रपटाची जवळजवळ अर्धे चित्रिकरण झालेली चित्रफीत चित्रनिर्मिती शाळेला १९२२ च्या नोव्हेंबर महिन्यात लागलेल्या आगीत भस्म झाली. त्या दुर्घटनेमुळे सदर चित्रपट अपूर्ण राहिला व " सैरंध्री ", " वत्सलाहरण " आणि " दामाजी " हे तीन चित्रपटही जळाले. त्या आगीत " सिंहगड " या " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२३ मध्ये प्रदर्शित केलेल्या ऐतिहासिक चित्रपटाच्या मुहूर्ताचे दृश्य वाचले होते. [८]

शिवाजी महाराजांचा शूर सरदार तानाजी मालुसरे याच्या पराक्रमावरील " सिंहगड " या चित्रपटासाठी बाबूराव पेंटरनी प्रसिध्द साहित्यिक ह. ना. आपटे यांची " गड आला पण सिंह गेला " ही कादंबरी निवडली होती. तानाजीची भूमिका बाळासाहेब यादव यांना दिली तर उदयमानच्या भूमिकेसाठी झुंझारराव पवार यांची निवड केली. ऐंशी वर्षाच्या शेलारमामांची भूमिका व्ही. शांताराम या तरूणाला दिली गेली. शिवाजीची भूमिका व दिग्दर्शन ही दोन्ही कामे बाबूराव पेंटर यांनी पार पाडली. देवलदेवी व कमलकुमारी यांच्या भूमिका अनुक्रमे गुलाबबाई व दारकाबाई यांनी केल्या. दारकाबाई या ब्राम्हण कन्येचे प्रथमच चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. [९]

सिंहगड चित्रपटामुळेच मुंबईच्या प्रेक्षकांनी बाळासाहेब यादव यांना " सरदार " व पवारांना " झुंझारराव " ही पदवी दिली व याच चित्रपटावर पहिला करमणूक कर बसला. [१०]

१९२३ साली सिंहगड व्यतिरिक्त " कृष्णावतार " व " इंद्रसभा " हे दोन पौराणिक चित्रपट निर्मित करायचे श्री. बाबूराव पेंटरनी ठरविले होते. [११] त्यानुसार महाभारतातील कृष्ण कथेवर आधारित " कृष्णावतार " चे दिग्दर्शनही त्यांनी स्वत:च केले. महाराष्ट्र फिल्म कंपनीतील व्ही. शांताराम,

कमलादेवी, झुंझारराव पवार व गणपत बकरे या नामवंत कलाकारांनी यात भूमिका केल्या. " इंद्रसभा " हा पौराणिक चित्रपट मात्र रद्द झाला. [१२] हा चित्रपट का रद्द झाला असावा, हे मात्र समजू शकत नाही. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९२४ साली दोन ऐतिहासिक चित्रपट सादर केले. [१३] बाबूराव पेंटर यांनी " कल्याण खजिना " व " सती पद्मीनी " या दोन ऐतिहासिक चित्रपटाचे दिग्दर्शन केले. [१४] शिवाजी महाराज व कल्याणचा सुभेदार या व्यक्तिरेखांवरील " कल्याणचा खजिना " या ऐतिहासिक चित्रपटात मुंबईच्या जुबेदा या सुंदर तरुणीने मुख्य भूमिका केली, तर कल्याणच्या सुभेदाराचे काम के.पी.भावे यांना देण्यात आले. महत्वाचे म्हणजे बेदी या तरुण पंजाबी व्यापाऱ्याने यात सुभेदाराच्या मुलाची भूमिका केली. याशिवाय नलिनी, झुंझारराव पवार, मा.विठ्ठल व स्वतः बाबूराव पेंटर यांनी यात भूमिका केल्या. मा. विठ्ठल म्हणजेच विठ्ठल बारगीर हा मुलगा पुढे भारतातील पहिल्या बोलपटाचा नायक म्हणून चमकला. " इंडियन डग्लस " म्हणून त्यास ओळखू लागले. [१५]

या चित्रपटानंतर " सती पद्मीनी " या चित्रपटामुळे परदेशी लोकांचा कोल्हापूराशी पत्रव्यवहार होऊ लागला, इतका हा चित्रपट भारतात आणि परदेशातही गाजला. [१६] या चित्रपटात संस्थेच्या नलिनी, द्वारका, व्ही. शांताराम, बाळासाहेब यादव, पवार, गणपत बकरे व बेदी या यशस्वी कलाकारांनी भूमिका केल्या होत्या. [१७] मेवाडच्या पार्श्वभूमीवर राणी पद्मीनीच्या ऐतिहासिक कथेवर हा चित्रपट चित्रित केला होता. [१८]

१९२५ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने दोन ऐतिहासिक चित्रपट सादर केले. [१९] " शहाला शह " या चित्रपटाच्या कथेचे लेखन नानासाहेब सरपोतदार यांनी केले. शहाजी या ऐतिहासिक व्यक्तिरेखेची, नाटकामध्ये

काम करणा-या श्रीपतराव मुधोळकर यांनी व बाजी घोरपडे या खलनायकाच्या भूमिकेत किशाबापू बकरे हे कलाकार चमकले. बाबूराव पेंटर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात आदिलशहाची व्यक्तिरेखा व्ही. शांताराम यांनी रंगविली. [२०] या व्यतिरिक्त बाळासाहेब यादव, कमलादेवी, झुंझारराव पवार यांनीही या चित्रपटामध्ये कामे केली. [२१]

१९२५ याच वर्षी ग्रामीण पार्श्वभूमीवरील सामाजिक चित्रपट " सावकारी पाश " हा एका गरीब शेतक-याची सावकाराकडून होणारी पिळवणूक या कल्पनेवर आधारीत बाबूराव पेंटरनी सादर केला. कथानक श्री. ना. ह. आपटे यांचे होते. [२२] शेतकरी - पवार, शेतक-यांचा पुत्र व्ही. शांताराम व सावकार - किशाबापू बकरे, अशा भूमिका दिल्या. सावकार - पुत्राचे काम के. धायबर व अन्याबाच्या पत्नीची भूमिका गुलाबबाई यांना दिली गेली. चित्रपटात कधीही काम न केलेल्या शंकरराव भूते या गृहस्थास दिवाणजीची भूमिका दिली गेली. [२३] चित्रपटाचे यश हे पात्र निवडीवर असते, हे बाबूरावांचे तत्व या चित्रपटाच्या यशास उपयोगी पडले.

दुस-या ऐतिहासिक चित्रपटासाठी त्यांनी " राणा हमीर " या ऐतिहासिक व्यक्तिरेखेची निवड केली. त्याचे दिग्दर्शनही बाबूराव पेंटरनी स्वत:च केले. १९२५ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात नेहमीचे यशस्वी कलाकार, बाळासाहेब यादव, व्ही. शांताराम व झुंझारराव पवार, तर कमलादेवी व अनुसयाबाई या स्त्री कलाकारांनी कामे केली होती. [२४] याच वर्षी महाराष्ट्र फिल्म कंपनीद्वारा निर्मित चित्रपट " माया बाजार " यासाठी पौराणिक कथा निवडण्यात आली होती व दिग्दर्शनही बाबूराव पेंटरनीच केले. व्ही. शांताराम, गणपत बकरे, कमलादेवी, झुंझारराव पवार यांच्या भूमिका असणारा " माया बाजार " हा संस्थेचा १९२५ सालात सादर केलेल्या चित्रपटातील चौथा चित्रपट होता. [२५]

महाराष्ट्र फिल्म कंपनीने एका पौराणिक चित्रपटाने १९२६ सालाची सुरुवात केली. चित्रपटाचे नांव होते " गजगौरी " व दिग्दर्शक होते, बाबूराव पेंटर, तर बाळासाहेब यादव, गुलाबबाई, अनुसयाबाई व झुंझारराव पवार यांनी यात काम केली होती. [२६]

आपल्या पुढील चित्रपटासाठी देखील बाबूराव पेंटर यांनी प्रल्हादाची पौराणिक कथा निवडली. १९२६ साली सादर झालेल्या " भक्त प्रल्हाद " या चित्रपटाचे दिग्दर्शन बाबूराव पेंटर यांनी व भूमिका बाळासाहेब यादव, गुलाबबाई, बाळ केळकर, शांताराम व कमलादेवी या नामवंत कलाकारांनी केल्या. [२७]

१९२७ साली कृष्णलीला, राधेची कृष्ण भक्ती या विषयावर " मुरलीवाला " हा पौराणिक चित्रपट बाबूराव पेंटरनी दिग्दर्शित केला. [२८] या चित्रपटात लालाजी गोखले याला कृष्ण व पेंद्याचे काम बाळ गजबर व शांतारामना अनयची भूमिका दिली. यशोदेची भूमिका पद्माबाई, राधेची सासू - तुळसाबाई व नंद म्हसकर मास्तरांनी सादर केला. [२९] " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने " नेताजी पालकर " हा ऐतिहासिक चित्रपट १९२७ ला निर्माण केला, ज्याचे दिग्दर्शन करण्याची संधी व्ही. शांताराम व के. धायबर यांना देण्यात आली. [३०] फत्तेलाल यांनी कला दिग्दर्शक व छायाचित्रण या बाजू सांभाळल्या. नेताजीची प्रमुख भूमिका बाळासाहेब यादव, तर शिवाजी महाराजांची भूमिका वसंतराव देशपांडे यांना देण्यात आली होती. व्यंकोजी वाघ बापूसाहेब माने यांनी उभा केला, तर नायिकेचे पात्र अनुसयाबाईंनी रंगविले. व्यंकोजी वाघ व नेताजी या पात्राचे खंजिराच्या लढाईचे दृश्य धाडसी रितीने चित्रित केले होते. [३१]

आपल्या पुढील चित्रपटासाठी बाबूरावांनी सत्यवान सावित्रीची

पौराणिक कथा निवडली. १९२७ साली प्रदर्शित झालेल्या व बाबूराव पेंटर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाचे नांव होते " सती सावित्री. " [३२] " महाराष्ट्र फिल्म कंपनी " तील बाळासाहेब यादव, गुलाबबाई, निंबाळकर पवार, व्ही. शांताराम व पद्मा या कलाकारांनी भूमिका केल्या. [३३] या चित्रपटानंतर १९२८ साली कर्णाची व्यक्तिरेखा असलेला पौराणिक चित्रपट " कर्ण " हा दामले व फत्तेलाल यांनी दिग्दर्शित केला. [३४] कर्णाची मुख्य भूमिका बाळासाहेब यादव यांनी, तर दुर्योधनाची भूमिका आय. टी. निंबाळकर यांनी रंगविली. तुकाराम मांडरे व पवार यांनी अनुक्रमे धृतराष्ट्र व शकुनीची कामे केली, तर श्रीकृष्णाचे काम नाद्रेकर व धर्माचे काम म्हसकर मास्तर यांनी केले. अर्जून, भीम, नकूल व सहदेव या कामासाठी नवीन मंडळींची निवड केली गेली. कौरव - पांडव लढाईचे चित्रण असलेल्या या पौराणिक चित्रकृतीची लांबी पन्नास हजार फूटावरून बारा-तेरा हजार फूट इतकी संकलनाच्या सहाय्याने कमी केली व हे संकलनाचे कार्य शांताराम व के. धायबर यांनी केले. [३५]

" बाजी देशपांडे " या ऐतिहासिक चित्रपटाने १९२९ सालची सुरूवात " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने केली. [३६] बाजीप्रभू देशपांडे या शूर पुरूषाच्या शौर्यावर आधारित हा चित्रपट बाबूराव पेंटर यांनी दिग्दर्शित केला व त्यात कामही केले. बाळासाहेब यादव, व्ही. शांताराम, कमलादेवी, के. धायबर, बकरे, तुळसा व नाद्रेकर यांनी यात भूमिका करून सदर चित्रपट यशस्वी करण्यास हातभार लावला. [३७] १९२९ साली " सिंड्रेला " या अद्भूतरम्य परिकथेवर " निशा सुंदरी " [ मिडनाईट गर्ल ] हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने निर्मित केला. कमलादेवी, निंबाळकर, सरोजीनी, भागवत या कलावंतांनी मोती बी. गीडवानी या लंडनहून दिग्दर्शनाचे शिक्षण घेऊन आलेल्या दिग्दर्शकाच्या हाताखाली या चित्रपटात भूमिका केल्या. [३८]

12417
A

अशा रितीने " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने १९१९ ते १९२९ पर्यंत १९ चित्रपटांची निर्मिती केली.[३९] यानंतरदेखील संस्थेने चित्रपट सादर केले, पण कोल्हापूरात ही एकच चित्र निर्मिती संस्था न रहाता " प्रभात फिल्म कंपनी " या नवीन संस्थेची भर पडलेली दिसून येते.

" प्रभात फिल्म कंपनी " ची स्थापना :

विष्णूपंत दामले [१८९३-१९५४], केशवराव धायबर, व्ही. शांताराम [ १९०१ - १९९० ], साहेबमामा फत्तेलाल [ १८९४-१९६४ ] व कुलकर्णी या पांच जणांची " प्रभात फिल्म कंपनी " ची स्थापना १ जून, १९२९ रोजी कोल्हापूरातील मंगळवार पेठेत केली.[४०] या संस्थेच्या स्थापनेमागील कारणांचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " महारथी कर्ण " या चित्रपटानंतर म्हणजे १९२८ नंतर संस्थेत लंडनला राहून दिग्दर्शनाचे तंत्र शिकून आलेले मोती बी. गीडवानी यांना संस्थेत दिग्दर्शनासाठी ठेवले. पूर्वी व्ही. शांताराम, धायबर, दामले व फत्तेलाल या दोघा - दोघांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट यशस्वी झाले असतानाही, या नवीन माणसाला संस्थेत ठेवण्याची गरज का वाटावी ? असे या सर्वांना वाटू लागले. तसेच गीडवानी व आण्णा गुणे हे नवीन असूनही त्यांना या चौघापेक्षा जास्त पगार होते.[४१] दामले व फत्तेलाल ब-याच दिवसांपासून स्वतंत्र चित्र निर्मितीचा विचार करीत होते. त्यास या गोष्टीने चालना मिळाली.[४२] कोल्हापूरच्या " स्टार " चित्रपटगृहात मॅनेजरचे काम पहात असल्याने व संस्थेत बाबुरावांच्या हाताखाली तांत्रिक ज्ञानही बरेच मिळाल्याने, चित्रपटात भूमिका केल्याने, व्ही. शांताराम यांना चित्रपटाच्या अंतरंगा बरोबर धंदा कसा करायचा, हे देखील समजले

होते. केशवराव धायबर व शांताराम यांच्याही मनात चित्रपट संस्था काढण्याचे आले. संस्थेमध्ये शिस्तीसाठी संस्था सुरू झाल्याची व सुटल्याची थट्टा होऊ लागली. हजेरी पुस्तकाचा वापर होवू लागला. या सर्व गोष्टी अपमानकारक वाटू लागल्याने संस्था सोडण्याचे विचार अधिकच जोर धरू लागले व त्यातूनच " प्रभात " चा उदय झाला.[४३]

" प्रभात फिल्म कंपनी " ने आपला पहिला चित्रपट १९२९ साली श्रीकृष्णाच्या बाल लिलांवर आधारीत " गोपालकृष्ण " हा सादर केला. मुंबईच्या मॅजिस्टिक सिनेमागृहात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनी केले होते.[४४] कंसाच्या भूमिकेसाठी ज्ञानोबा माने या पेहेलवानास, तर कृष्णासाठी सुरेश नावाच्या मुलाला घेण्यात आले. यशोदेची भूमिका कमलादेवीनी वठविली. राधेचे काम विजया या तरुणीला देण्यात आले. अनंत आपटेनी देखील यात भूमिका केली होती.[४५]

" प्रभात फिल्म कंपनी " ने १९३० सालची सुरुवात " खुनी खंजर " या सामाजिक आशय असणा-या साहसपटाने केली. विजया व माने हे पहिल्या चित्रपटातील कलावंतच यात घेण्यात आले व चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनी केले. [४६] नायक आणि खलनायक यांच्यातील तलवारीची लढाई प्रेक्षकांच्या मनाचा थरकाप उडवणारी अशी चित्रित केली होती.[४७] १९३० याच वर्षी लहान मुलांची प्रमुख भूमिका असणारे कथानक व्ही. शांताराम यांनी निवडले. पटकथा भालजी पेंढारकर या त्यांच्या मावस भावानीच लिहीली.[४८] दिग्दर्शन स्वत: व्ही. शांताराम यांनी केले. " रानीसाहीबा " या चित्रपटात ज्ञानोबा माने, कमलादेवी व गोपालकृष्ण मधील पाच वर्षीय अनंत आपटे अर्थात बजरबट्टू यांनी भूमिका केल्या. स्वत: व्ही. शांताराम यांनीदेखील या चित्रपटात काम केले.[४९] " उदयकाल " यातदेखील व्ही.

शांतारामानी स्वत: भूमिका केली. शिवाजी महाराजांच्या जीवनावरील ऐतिहासिक चित्रपट १९३० ला प्रभातने निर्मित केला. [५०] या चित्रपटात शिवाजी महाराजांच्या वाघ्या कुत्र्याचे काम करणारा कुत्रा चित्रपटानंतर निघून गेला. तो पुन्हा सापडलाच नाही. [५१] या चित्रपटात कमलादेवी यांनी व बजरबट्टू, माने यांनीही भूमिका केल्या होत्या. [५२]

अनेक कलात्मक चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " द्वारा निर्माण व दिग्दर्शन करणारे बाबूराव पेंटर हे १९३० ला संस्थेमधून बाहेर पडले. " लंका " हा या संस्थेतील त्यांचा शेवटचा चित्रपट होय. [५४] " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या मालकांतील मतभेदामुळे बाबूराव पेंटरनी संस्थेचा राजीनामा दिला. [५५] या काळात चित्रपटांची सुरुवात असल्याने चित्रपट - गृहांची संख्या कोल्हापूरात दोन - तीन इतकीच होती. [५६]

## १९३० च्या दशकांतील चित्रपट निर्मिती :

१९३१ साली " राणी रुपमती " हा ऐतिहासिक व्यक्तिरेखेवरील चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने भालजी पेंढारकर यांच्या दिग्दर्शना - खाली सादर केला. बाजबहाद्दर व त्याची राणी रुपमती या इतिहासातील प्रसिध्द व्यक्तिवर निर्माण केलेल्या या चित्रपटात सुलोचना व चौधरी यांनी नायक - नायिकेची भूमिका केली होती. [५७] याच वर्षी बाळासाहेब यादव दिग्दर्शित " दुश्मन की रात " हा चित्रपट प्रदर्शित झाला. सुशिलादेवी, पद्मीनी या स्त्री कलाकार व बी. नाद्रिकर, मानाजीराव आणि स्वत: बाळासाहेब यादव यांनी यात भूमिका वठविल्या होत्या. [५८] मात्र या चित्रपटाचा विषयाचा उल्लेख मिळत नाही.

" प्रभात फिल्म कंपनी " ने १९३१ ला " जुलूम " हा सामाजिक कथा असणारा साहसपट तर " चंद्रसेना " हा पौराणिक चित्रपट निर्मित केला.[५९] अनुक्रमे के. धायबर व व्ही. शांताराम यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. " जुलूम " च्या कलाकारां विषयी फारसी माहिती उपलब्ध होत नाही. तरीदेखील बाबूराव पेंढारकरांनी त्यात खल पुरुषाची भूमिका केली होती.[६०] " चंद्रसेना " या रामभक्त नागकन्येच्या जीवनावरील चित्रपटामध्ये कमलादेवी व लिलावती या स्त्री व माने या पुरुष कलाकाराने भूमिका केली होती.[६१]

१९३२ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने आपला शेवटचा चित्रपट " किस्मत " प्रदर्शित केला. यातील प्रमुख कलाकार मुंबईची सुनीता खान, दास, वर्दे, निंबाळकर व बी. नांद्रिकर हे होते. तर दिग्दर्शक म्हणून बाबूराव पटेल यांनी काम पाहिले.[६२] त्यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटानंतर " महाराष्ट्र फिल्म कंपनी " बंद पडली. ती का बंद पडली याचे कारण शोधताना एक उल्लेख बाबूराव पेंटर संस्था सोडून गेल्यानंतर तानीबाई या दुस-या भागीदारही लवकरच मरण पावल्या व तिसरे भागीदार श्री. नेसरीकर यांच्या मृदू स्वभावाचा फायदा अनेकांनी घ्यायला सुरुवात केली व याचे पर्यावसान संस्था बंद पडण्यात झाले असा सापडतो.[६३]

## " आनंद पिक्चर्स " ची चित्रपट निर्मिती :

१९३२ सालातील चित्रपटांत " आनंद पिक्चर्स " च्या बाबुराव पेंटर दिग्दर्शित " प्रेम संगम " चा उल्लेख आढळतो. एक तास एकोणपन्नास मिनिटांच्या या चित्रपटाला १९३४ साली आवाजाची जोड दिल्याने त्या मूकपटाचे रूपांतर बोलपटात झाले.[६४] या चित्रपट संस्थेच्या स्थापने विषयी-ची माहिती मात्र तात्कालीन संदर्भ साधनात उपलब्ध नाही.

बोलपटांचा उदय :

मूकपटाला आवाजाची जोड मिळाल्याने चित्रपट बोलायला भारतात प्रथम सुरुवात १९३१ साली झाली. " आलम आरा " हा " इंपिरियल फिल्म कंपनी " ने निर्माण केलेला पहिला हिंदी बोलपट होय.[६५] मराठी भाषेतील " मास्टर ॲण्ड कंपनी " ने १९३२ साली " संत तुकाराम " हा सादर केला.[६६] बोलपटाची सुरुवातही कोल्हापूरात १९३२ सालीच झाली. कोल्हापूरच्या " प्रभात " या चित्र संस्थेने " अयोध्येचा राजा " हा पौराणिक कथा असणारा हिंदी व मराठी दोन्ही भाषांतील संस्थेचा पहिला बोलपट व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केला.[६७] हरिश्चंद्र व तारामती यांच्या कथेवर आधारीत या पौराणिक चित्रपटात हरिश्चंद्राची मुख्य भूमिका गोविंदराव टेंबे यांनी केली व चित्रपटाचे संगीतही त्यांनीच दिले.[६८] तारामतीच्या भूमिकेसाठी मुंबईच्या दुर्गा खोटे या सुविध्य नटीची निवड करण्यात आली. गंगानाथ महाजन या खलनायकाच्या भूमिकेत बाबूराव पेंढारकर चमकले. तर मास्टर विनायकांनी नारदाची भूमिका केली होती.[६९] चित्रपट बोलू लागल्याने मूकपटाच्या काळात असणारे अभिनयाचे महत्व कमी झाले. कारण मूकपटात केवळ अभिनयाच्या जोरावर व्यक्तिरेखा वठवावी लागे, तर बोलपटात पात्र बोलू लागल्याने त्यास काय म्हणावयाचे, ते बोलण्यातून देखील कळू लागले.[७०]

बोलपटाच्या शृंखलेतील " अग्निकंकण " हा पुढील चित्रपट " प्रभात " ने १९३२ ला निर्मित केला.[७१] " जलती निशानी " हे हिंदी नांव असणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम व संगीत दिग्दर्शन गोविंदराव टेंबे यांनी केले. नायिकेचे काम लीला चंद्रगिरी यांना दिले व मास्टर विनायक, बाबूराव पेंढारकर व बुवासाहेब या अभिनेत्यांची निवड चित्रपटातील

निरनिराळ्या भूमिकांसाठी करण्यात आली.[७२] १९३२ लाच " माया मच्छिंद्र " हा पौराणिक चित्रपट " प्रभात " ने सादर केला. दुर्गा खोटे व गोविंदराव टेंबे यांनी प्रमुख भूमिका केलेल्या या चित्रपटात मा. विनायक [१९०६-१९४७], बजरबट्टू, लीला, बाबूराव पेंढारकर यांनीदेखील कामे केली होती. अभिनया बरोबरच संगीत व संवादाची जबाबदारीही गोविंदराव टेंबे यांनी पार पाडली.[७३] मच्छिंद्रनाथ यांच्या अद्भूत सामर्थ्याचे चित्रण असणा-या या चित्रपटात एकोणीस गीते होती व चित्रपटाचा अवधी जवळजवळ अडीच तासापेक्षा अधिक होता. कला दिग्दर्शन व छायाचित्रण ही खाती अनुक्रमे फत्तेलाल व धायबर यांनी सांभाळली. गोविंदराव टेंबे बरोबरच ना. वि. कुलकर्णी यांनीदेखील संवाद लेखनाचे काम केले, तर ध्वनी व गीत मुद्रणाची बाजू विष्णूपंत दामलेंनी सांभाळली.[७४]

## " छत्रपती सिनेटोन " ची स्थापना :

" प्रभात " ची चित्रपट निर्मिती सुरु असतानाच " महाराष्ट्र फिल्म कंपनी " तील प्रमुख नट श्री. बाळासाहेब यादव यांनी १९३२ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " बंद पडल्यावर त्याच ठिकाणी " छत्रपती सिनेटोन " ची स्थापना केली.[७५] " मराठ्यातील दुही"अर्थात " अमर शहीद " हा मराठी व हिंदी नावे असलेला चित्रपट बाळासाहेब यादव यांनी १९३२ साली प्रदर्शित केला.[७६]

दिग्दर्शन व प्रमुख भूमिका या दोन्ही गोष्टी बाळासाहेब यादव यांनीच सांभाळल्या. संताजी घोरपडे या शूर मराठी सरदाराच्या जीवनावरील या ऐतिहासिक चित्रपटात सात गीते होती व या गीतांना संगीत दिले होते,

श्री. आण्णासाहेब माईणकर यांनी. चित्रपटाची कथा व संवाद र.कृ. चिंचलीकर यांनी लिहीले, तर कला हे खाते एस्. एन्. कुलकर्णी व एस्. गायकवाड यांनी सांभाळले. चित्रपटास ध्वनि आर.जी.तोरणे यांचा होता. दोन तास आठ मिनिटाच्या या चित्रपटाचे छायाचित्रण हे खाते गजानन कांबळे व बाबा साखरीकर यांनी सांभाळले होते. श्री. बाळासाहेब यादव यांनी या चित्रपटात काम करण्यासाठी झुंझारराव पवार, नाद्रिकर, एम्. डी. शिंदे, के. नारायण चव्हाण, अमीर पठाण, अमीर खान या कलाकारांची तर कुमारी हंसा, कुमारी पद्मा, या स्त्री कलाकारांची निवड केली.[७७] हिंदी गीत असलेला हा पहिलाच चित्रपट होय.[७८] " छत्रपती सिनेटोन " च्या नंतरच्या चित्रपटांसाठी यादव यांनी पौराणिक कथेची निवड केली व " कुरुक्षेत्र " हा कौरव - पांडव युध्दावर आधारीत हिंदी व मराठी दोन्ही भाषात १९३३ साली प्रदर्शित केला. अडीच तास नऊ मिनिटांच्या या चित्रपटात सतरा गीते होती व गीतकार बालतनय हे होते.[७९] गीताला संगीत मुर्जिखान यांनी दिले. बाळासाहेब यादव यांनी स्वत: दिग्दर्शन व भुमिका केलेल्या या चित्रपटाची कथा आर. के. चिंचलीकर यांची होती. ध्वनि व छायाचित्रण ही खाती अनुक्रमे गजानन कांबळे व घाटगे यांनी सांभाळली होती. चित्रपटाचे कला दिग्दर्शक म्हणून एस्. एन्. कुलकर्णी व एस्. गायकवाड यांनी काम पाहिले. चित्रपटात काम करण्यासाठी बाळासाहेब यादव यांनी माधवराव जोशी, भोसले, अनुसया, पद्माबाई, शारदा व शालिनी, झुंझारराव पवार, नाद्रिकर, पाटील व डी. आर. जाधव अशा अनेक कलाकारांची निवड केली.[८०] या दोन चित्रपटांनंतर मात्र चित्रसंस्था बंद झाली, पण का बंद झाली असावी याचा उल्लेख मात्र सापडत नाही.

यानंतर " प्रभात फिल्म कंपनी " ने " महाराष्ट्र फिल्म कंपनी " चा

" सिंहगड " हा मूकपट बोलका करावयाचे ठरविले व ह. ना. आपटे यांच्या " गड आला पण सिंह गेला " या कादंबरीचे हक्क विकत घेवून " सिंहगड " या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती १९३३ ला केली.[८१] व्ही. शांताराम यांनी स्वत: दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात प्रमुख भूमिकेसाठी शंकरराव भोसले, लीला, मा. विनायक, बाबूराव पेंटारकर, बुवासाहेब व के. धायबर यांची निवड करण्यात आली. संगीत दिग्दर्शक गोविंद टेंबे असलेल्या या चित्रपटात नऊ गाणी होती. सव्वा दोन तास कालावधी होता.[८२] चित्रपटात कला दिग्दर्शन विभाग फत्तेलाल व ध्वनि विभाग फत्तेलाल आणि व्ही. दामले या दोघांनी सांभाळला होता. के. धायबर यांचे छायाचित्रण असलेल्या या चित्रपटासोबत महाराष्ट्रातल्या प्रमुख कवींवर चित्रित केलेला " कवी संमेलन " या नावाचा प्रभातचा लघुपट दाखविला जाई.[८३]

## रंगीत चित्रपटाची निर्मिती :

चित्रपटाच्या प्रगतीचे नवनविन टप्पे गाठत असताना रंगीत चित्रपट सादर करण्याचा यशस्वी प्रयत्न कोल्हापूरच्या चित्रपट संस्थेने केला. हा मान १९३३ साली " सैरंध्री " या चित्रपटाद्वारे " प्रभात फिल्म कंपनी " ने मिळविला.[८४] " सैरंध्री " ची कथा असणारा व " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने याच विषयावर सादर केलेला चित्रपट व्ही. शांताराम यांनीदेखील निर्माण करावयाचे ठरविले. त्यांनी स्वत: संकलन व दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटाची प्रत त्यांनी जर्मनीहून रंगीत करून आणली.[८५] " आग्फा कंपनी " ने रंगीत प्रत तयार केलेल्या या चित्रपटाची ध्वनिमुद्रीकाही जर्मनीच्याच " टाकाफोन कंपनी " ने काढल्या. भारतीय चित्रपटातील गाण्यांची ही पहिला ध्वनिमुद्रीका होय.[८६] चित्रपटात लिला चंद्रगिरी

यांनी सैरंध्रीची मुख्य भूमिका केली होती. अनुसया, प्रभावती, निंबाळकर, माने, भोसले, मास्टर विनायक, साळुंखे व भागवत या कलाकारांनी देखील यात निरनिराळ्या भूमिका पार पाडल्या. गोविंदराव टेंबेचे संगीत असलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद व गीते भालजी पेंढारकर यांनी लिहीली. कला दिग्दर्शन फत्तेलाल व ध्वनि विष्णुपंत दामले, तर छायाचित्रण विभाग के. धायबर यांनी सांभाळला.[८७] नऊ गीते असलेल्या या रंगीत चित्रपटाचा अवधी दीड तास, चोवीस मिनिटे होता.[८८] " सैरंध्री " या रंगीत चित्रपटाच्या निर्मितीनंतर " प्रभात फिल्म कंपनी " ने नोव्हेंबर, १९३३ साली पुण्यास स्थलांतर केले. कोल्हापुरात वीज पुरवठयाची तांत्रिक समस्या निर्माण झाल्याने व पुणे हे मुंबईपासून जवळ असल्याने प्रभातच्या सर्व चालकांनी पुण्याला संस्था स्थलांतरीत करावयाचा निर्णय घेतला.[८९] " प्रभात फिल्म कंपनी " पुण्याला गेल्यामुळे चित्रपट निर्मिती संस्थेची कोल्हापुरात कमतरता निर्माण झाली असती, पण तसे झाले नाही.

## " कोल्हापूर सिनेटोन " व " शालिनी सिनेटोन " ची स्थापना :

कोल्हापूरात बेलबागेत दि. १.१०.१९३३ रोजी महाराजांनी " कोल्हापूर सिनेटोन " या नावाची चित्रपट संस्था स्थापन केली.[९०] त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून, राजाराम महाराजांच्या भगिनी आक्कासाहेब महाराजांनी खास बाबूराव पेंटरासाठी १९३३ या वर्षीच " शालिनी सिनेटोन " या चित्रपट संस्थेची स्थापना कोल्हापुरात केली.[९१]

१९३४ सालाची सुरुवात कोल्हापूर सिनेटोन ने कृष्ण चरित्रावर " आकाशवाणी " या पौराणिक चित्रपटाची निर्मिती करून केली, सदर

चित्रपटात मा. विनायक यांनी वासुदेवाची भूमिका केली, तर नानासाहेब फाटक यांनी कंसाचे पात्र वठविले. दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद व गीते या सर्व गोष्टी भालजी पेंढारकर यांनी सांभाळल्या. संगीत गुंडोपंत वालावलकर यांचे असलेल्या या चित्रपटाचे ध्वनि व गीतमुद्रण देखील श्री. वालावलकर यांनीच केले. चिंतामणराव मोडक या गृहस्थाने देखील त्यांना या कामात मदत केली. शंकरराव शिंदे यांचे कला दिग्दर्शन व व्ही. बी. जोशी यांची छायाचित्रण असणा-या या चित्रपटात बाबूराव पेंढारकरांनी कंसाचा सेनापती दिग्पालची भूमिका केली. या व्यतिरिक्त लिला चंद्रगिरी, डॅा. साठे, मा. वसंत, शिरोडकर व स्वत: भालजी पेंढारकरांनी काम केले.[१२] तेरा गीते असणा-या या चित्रपटाचा अवधी १५२ मिनिटे होता.[१३]

" श्याम सिनेटोन " चित्रपट संस्था :

१९३४ साली " श्याम सिनेटोन " ने पार्थकुमार हा पौराणिक चित्रपट सादर केला.[१४] या चित्रपट संस्थेची कोणत्या साली स्थापना झाली, याचा उल्लेख सापडत नसला तरी, " पार्थकुमार " हा चित्रपट कोल्हापूरातील सरदार महागावकर, चिंचलीकर व दत्तवाडकर व भालजी पेंढारकर यांनी भागीदारीत काढला, मात्र भालजी नंतर संस्थेतून बाहेर पडले.[१५] अर्जुनपुत्र व बलराम कन्या यांच्या विवाह कथेवर आधारीत या पौराणिक चित्रपटाचे दिग्दर्शन भालजी पेंढारकर व वाय. डी. घोरपडे यांनी केले. बारा गीते असलेल्या या चित्रपटास वालावलकर यांनी संगीत दिले, तर चित्रपटाचे संकलन एस्. बी. कांबळे व घोरपडे यांनी केले. बाज गजबरांची कला व व्ही. एम्. कांबळे यांच्याकडे ध्वनि विभाग असलेल्या या चित्रपटात मा. एरिक, बंडोपंत सोहोनी, चव्हाण, माधवराव जोशी, मानाजी माने, कृष्णाबाई रामदुर्गकर व शकुंतला बानू वसगडेकर यांनी भूमिका केल्या.[१६] चित्रपटाचा कालावधी होता अडीच तास व पाच मिनिटे इतका.[१७]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

" सम्राट सिनेटोन " ची चित्रपट निर्मिती :

१९३५ साली " सम्राट सिनेटोन " या डी.जी. वणकुद्रे यांच्या चित्रपट संस्थेने " नागानंद " हा हर्षवर्धन लिखित संस्कृत नाटकावर आधारीत पौराणिक चित्रपट सादर केला.[९८] १९३० ला स्थापन झालेल्या या संस्थेच्या " स्वर्ग " या चित्रपटाची निर्मिती के.पी. भावे या दिग्दर्शकाशी मतभेद झाल्याने अपूर्णच राहिली. त्यामुळे नागानंद या दुस-या चित्रपटाच्या निर्मितीस सुरुवात करून दिग्दर्शन व पटकथा लिखाणासाठी मद्रासच्या वाय. व्ही. राव यांना आमंत्रित केले. आझमबाई, वामनराव सडोलीकर, गायकवाड, ठाणेकर व एकनाथ पारगांवकर यांनी भूमिका केल्या. काशिनाथ बावडेकरांनी छायाचित्रित केलेल्या या चित्रपटातील संवाद व गीते ठाणेकर यांचीच होती. तेरा भावपूर्ण गीतांना वामनराव सडोलीकरांनी संगीत दिले. ध्वनिमुद्रण आर. एन्. बांदिवडेकर यांनी तर बी. के. जोशींनी कला दिग्दर्शन केले. दोन तास अकरा मिनिटांच्या या चित्रपटाचे, आर्थिकदृष्टया यशस्वी न झाल्याने आर्थिक नुकसान झाले व त्याचे पर्यावसान संस्थेने चित्रपट निर्मिती बंद करण्यात झाले.[९९]

१९३५ या वर्षाची सुरुवात कोल्हापूर सिनेटोनने महाभारतातील कृष्ण व कलासूर कालियाच्या कथेवरील " कालिया मर्दन " या पौराणिक कथेची निर्मिती करून केली. १३९ मिनिटांच्या या चित्रपटात १४ गीते होती. संगीत दिले दादा चांदेकर यांनी.[१००] गीत, संवाद, कथा व पटकथा या सर्व लेखनाची जबाबदारी भालजी पेंढारकर यांनी उचलली. दिग्दर्शनही भालजींनी स्वत: व दादासाहेब निंबाळकर यांच्या मदतीने केले. अनेक चित्रपटात छाया-चित्रण विभाग सांभाळणा-या गजानन कांबळे यांनी याही चित्रपटात तो विभाग सांभाळला. चित्रपटातील कला दिग्दर्शनाची जबाबदारी शंकरराव शिंदे यांची होती. लिला चंद्रगिरी व इंदूबाला या स्त्री कलाकारांनी व मा. मधुकर राम भद्रे, शंकरराव भोसले, चिटणीस व इब्राहिम या पुरुष कलाकारांनी भूमिका

करून चित्रपट यशस्वी करण्यास हातभार लावला. या चित्रपटाची हिंदी आवृत्ती " मुरलीवाला " या नावाने प्रदर्शित झाली.[१०१]

" शालिनी सिनेटोन " ने १९३५ याच वर्षी " उषा " या शिवभक्त राजा बाणासुरची पौराणिक कथा असलेल्या चित्रपटाची निर्मिती केली.[१०२] बाबूराव पेंटर यांनी दिग्दर्शित केलेल्या या पहिल्या बोलपटास संगीत गोविंदराव टेंबे यांनी दिले होते. ध्वनि व छायाचित्रण हे विभाग अनुक्रमे बी.जी.देसाई व के.व्ही.माचवे यांनी सांभाळले. हिंदीतही काढण्यात आलेल्या या चित्रपटाच्या जाहिरात पुस्तिकेवर उषा मंत्री या नायिकेचे अप्रतिम चित्र बाबूराव पेंटर यांनी तयार केले होते. अकरा गीते असलेल्या या चित्रपटात उषा मंत्री व्यतिरिक्त रत्नप्रभा, सुशिलादेवी या स्त्री कलावंत व वासुदेव काळे, टेंबे स्वत:, करमरकर व विनय काळे या पुरुष कलाकारांची निवड केली होती. कला विभाग देखील बाबूराव पेंटर यांनी सांभाळलेल्या या चित्रपटाचा कालावधी दोन तास दोन मिनिटे इतका होता.[१०३]

१९३५ सालातील " कोल्हापूर सिनेटोन " च्या " विलासी ईश्वर " या दुसऱ्या चित्रपटासाठी सामाजिक कथेची निवड करण्यात आली.[१०४] प्रसिध्द साहित्यिक मामा वरेरकर यांची कथा असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन मा.विनायक यांनी केले. र.शं.जुन्नरकर यांनी चित्रपटाची कथा लिहीली व चित्रपटाचे संकलनही केले. व्ही.बी.जोशी याचे छायाचित्रण असलेल्या या चित्रपटाचे कला दिग्दर्शन शिंदे यांनी केले. ध्वनि विभाग ठाकूर यांनी सांभाळला, दोन तासांच्या या चित्रपटात मराठी चित्रपटातील पहिले आंग्लभाषिक गाणे होते. " निगाह-ए-नफरत " हे हिंदी नांव असलेल्या या चित्रपटात अकरा गीते होती व शोभना समर्थ या अभिनेत्रीने चित्रपटात प्रथम काम केले. बाबूराव पेंढारकर व मा.विनायक यांनी स्वत: भूमिका केलेल्या,

या चित्रपटात इंदिरा वाडकर, बाळ ढवळे, गुंडोपंत वालावलकर व माईणकर हे कलावंतही होते. [१०५]

" हंस चित्र " ची स्थापना :

प्रशासकीय कामातील गोंधळामुळे व अधिका-यांच्या हस्तक्षेपामुळे कंटाळून बाबूराव पेंढारकर यांनी " कोल्हापूर सिनेटोन " ही संस्था सोडली. [१०६] नवीन चित्रपट संस्था स्थापण्याचा विचार करून मार्च, १९३६ ला मा. विनायक व छाया चित्रकार पांडुरंगराव नाईक यांच्याबरोबर " हंस चित्र " ची स्थापना केली. कोल्हापूरात चित्रपट निर्मितीगृह मिळणे अवघड असल्याने पुण्याचा " सरस्वती सिनेटोन " भाड्याने घेऊन " छाया " या सामाजिक चित्रपटाचा मुहूर्त केला. मा. विनायकांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला. [१०७]

१९३६ साली ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारीत सामाजिक चित्रपट " शालिनी सिनेटोन " ने निर्मित केला. [१०८] गरीब शेतक-याची सावकाराकडून होणारी पिळवणूक, हा विषय असलेल्या " सावकारी पाश " या चित्रपटाचे पं. नेहरू, सरोजिनी नायडू या पुढा-यांनी कौतुक केले. बाबूराव पेंटर यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाची कथा ना. ह. आपटे व पटकथा, संवाद विष्णूपंत औंधकर यांचे होते. गणपतराव वडणगेकर या गृहस्थाने कलादिग्दर्शन विभाग सांभाळला, तर छायाचित्रण व ध्वनि या खात्यांची जबाबदारी के. व्ही. माचवे व काळे यांनी अनुक्रमे पार पाडली. सात गीते असलेल्या या चित्रपटात झुंझारराव पवार, चंद्रकांत मांडरे, औंधकर, अमीना, सरदार बाई, के. दाते, विष्णूपंत जोग या नामवंत कलाकारांनी कामे केली. [१०९]

" कोल्हापूर सिनेटोन " ने भारतीय चित्रपट कलेचे आद्य जनक दादासाहेब फाळके यांना आमंत्रित केले. फाळके यांनी दिग्दर्शित केलेला पौराणिक चित्रपट " गंगावतरण " हा"कोल्हापूर सिनेटोन" ने १९३७ साली निर्माण केला.[११०] हिंदी व मराठी दोन्ही भाषातील या चित्रपटाचे कथा, पटकथा, संवाद व गीते लिहीण्याचे कामही श्री.फाळके यांनीच केले होते. सोळा गीतांनी परिपूर्ण असा हा चित्रपट संकलित केला बाबाराय फाळके व बी.बी.गायकवाड यांनी. ध्वनि विभाग बाळ चव्हाण व कला विभाग नेहमीप्रमाणे शंकरराव शिंदे यांनी सांभाळला. अभिनव दृश्य व चमत्कार या महत्वाच्या बाजूदेखील बाबाराय फाळकेनी सांभाळल्या. शंकर भोसले, पठाण व इब्राहिम यांच्याबरोबर गवळी, लिला मिश्रा, महानंदा व अनुसयाबाई, बर्चीबहाद्दर यांनी भूमिका करून चित्रपट यशस्वी करण्यास हातभार लावला. या चित्रपटाचा कालावधी दोन तास बावीस मिनिटे इतका होता.[१११]

" कोल्हापूर सिनेटोन " ची बरीचशी मदार बाबूराव पेंढारकर व भालजी पेंढारकर यांच्यावर असल्याने त्यांनी संस्था सोडल्यावर या चित्रपट संस्थेला ग्रहण लागून हळूहळू ही संस्था बंद होण्याच्या मार्गावर होती. " गंगावतरण " हा " कोल्हापूर सिनेटोन " या अखेरचा चित्रपट ठरतो.[११२]

१९३७ साली " शालिनी सिनेटोन " ने " कान्होपात्रा " ही विठ्ठल भक्त कान्होपात्रेच्या जीवनावरील संतकथा निवडली.[११३] कान्होपात्रेतील दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद व गीतलेखन या सर्व बाजू श्री. भालजी पेंढारकर यांनीच उत्तम रितीने पार पाडल्या. यातील सोळा गीतांना मधुर संगीत द्यावयाचे काम बालाजी चौगुले यांनी केले व कला दिग्दर्शनाची महत्वाची जबाबदारी बाळ गजबर यांनी पार पाडली. लीला व लोंढे यांच्या प्रमुख

भूमिका असणा-या या चित्रपटात दिनकर देरे, चिंतामणराव कोल्हटकर, शांताबाई व इंदूबाला, राजा परांजपे व दानवे यांनीदेखील महत्वाच्या भूमिका केल्या. १४७ मिनिटाच्या या चित्रपटात छायाचित्रण श्री. माचवे व शिंदे, तर ध्वनि विभाग श्रीखंडे आणि काळे यांनी सांभाळला.[११४]

" राष्ट्र सिनेटोन " ची चित्रपट निर्मिती :

१९३७ सालात निर्मित झालेल्या मराठी चित्रपटात " जादुगारीण " या चित्रपटाचा उल्लेख आढळतो.[११५] हा चित्रपट " राष्ट्र सिनेटोन " ने निर्मित केला होता, पण तात्कालीन साधनात " राष्ट्र सिनेटोन " या संस्थेची निर्मिती केंव्हा व कशी झाली याची माहिती उपलब्ध नाही. सव्वा दोन तास, सात मिनिटे अवधी असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन व भूमिका " महाराष्ट्र फिल्म कंपनी " व " छत्रपती सिनेटोन " या संस्थेतील नामवंत नट बाळासाहेब यादव यांनी केली. त्यांना नाद्रिकर व साधना या कलावंतांनी भूमिका करुन साथ दिली.[११६] या चित्रपटाची कथा व गीते याविषयी माहिती उपलब्ध होत नाही. त्याचप्रमाणे दुसरा चित्रपट या संस्थेने सादर केल्याचा उल्लेख सापडत नाही, यावरुन या संस्थेने एकाच चित्रपटाची निर्मिती केली होती असा निष्कर्ष काढता येतो.

१९३७ या वर्षीचा " शालिनी सिनेटोन " चा " प्रतिभा " हा दोन तास पाच मिनिटांचा दुसरा चित्रपट संस्थेने एका प्रतिभावान कवी व त्यांच्या पत्नीच्या जीवनावर आधारीत सादर केला.[११७] ना. ह. आपटेंची कथा व संवाद असलेल्या या काल्पनिक ऐतिहासिक चित्रपटात दुर्गा खोटे यांनी नायिकेचे तर नानासाहेब फाटक, के. दाते, हिरा, मा. श्याम, विष्णुपंत औंधकर यांनी इतर भूमिका केल्या होत्या. जयशंकर दानवे, राजा परांजपे व सुप्रसिध्द गायिका हिराबाई बडोदेकर यांनीही यात कामे केली होती.

" हृदयाची श्रीमंती " या ह. ना. आपटेंच्या कादंबरीवरून घेतलेल्या चित्रपटाची हिंदी आवृत्ती देखील प्रदर्शित करण्यात आली. या चित्रपटा - मध्ये संकलनाचे महत्वाचे काम एस्. कांबळे यांनी व कला दिग्दर्शनाचे वैशिष्ठ्य-पूर्ण काम गणपत वडणगेकर यांनी पार पाडले. दहा गीते असलेल्या या चित्रपटातील गीते व संगीत गोविंदराव टेंबे यांचे होते. चित्रपटाच्या ध्वनि मुद्रीका मुंबईच्या " स्वी रेकॉर्डस् कंपनी " ने काढल्या. बाबूराव पेंटर यांनी स्वत: या चित्रपटचे दिग्दर्शन केले. [११८]

" हंस पिक्चर्स " ने कोल्हापूरात चित्रपट निर्मिती करावयास सुरूवात करून १९३७ ला " प्रेमवीर " या सामाजिक आशय असणा-या विनोदी चित्रपटाची निर्मिती केली. [११९] प्रीतम व पुतळी यांची प्रेमकथा असणा-या या चित्रपटाच्या हिंदी व मराठी दोन्ही आवृत्या प्रदर्शित झाल्या. सात गीते असणा-या या चित्रपटाने मराठी पार्श्वगायनाची सुरूवात झाली. तसेच अनेक वेषांतरे करणारा नायकही चित्रपटात प्रथमच दिसला. मा. विनायक यांचे दिग्दर्शन असणा-या या चित्रपटाची कथा व संवाद प्र. के. अत्रे यांनी स्वत: व कुमुद जाधव यांनी केले. चित्रपटातील रंगभूषेची कामगिरी शंकर गौड यांच्यावर तर वेशभूषा हे महत्वाचे खाते घाणेकर यांच्याकडे सोपविण्यात आले. वासुदेव कर्नाटकी यांचे छायाचित्रण असणा-या या चित्रपटात काम करण्यासाठी आशालता या स्त्री कलाकाराची निवड केली गेली. फिरोझ, साळवी, बापूराव दातार, यशवंत पेटकर, या कलाकारांची देखील निरनिराळ्या भूमिकांसाठी निवड केली होती. मा. विनायक यांनी स्वत: देखील या चित्रपटात काम केले होते. "एच्. एम्. व्ही." कंपनीने या चित्रपटाच्या ध्वनिमुद्रीका काढल्या. [१२०] या चित्रपटाचा कालावधी दोन तास चौदा मिनिटे इतका होता. [१२१]

" प्रिन्स शिवाजी प्रॉडक्शन " :

" कोल्हापूर सिनेटोन " चे सूत्रधार मेजर दादासाहेब निंबाळकरांनी [१९०१-१९८४] कोल्हापूरात " प्रिन्स शिवाजी प्रॉडक्शन " ची स्थापना केली.[१२२] ही स्थापना नेमकी किती साली झाली, याचा उल्लेख मिळत नसला तरी, या चित्रपट संस्थेने १९३७ साली " स्वराज्याच्या सीमेवर " या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती केली. अकरा गीते असलेल्या या चित्रपटास कर्णमधुर संगीत दादा चांदिकरानी दिले. कला दिग्दर्शनाची महत्वाची जबाबदारी शंकरराव शिंदे यांनी पार पाडली. सुप्रसिध्द चित्रपट कथा, पटकथा, संवाद व गीत लेखक श्री. भालजी पेंढारकर यांनी या चित्रपटात ही सर्व खाती सांभाळली. ध्वनि खाते चिंतामणराव मोडक, तर छायाचित्रण विभाग एस्. पी. शिंदे यांनी सांभाळला.[१२३] अकरा गीतांनी बहरलेल्या या चित्रपटात शिवाजी महाराज यांचा शूर शिलेदार राया याच्या शौर्याची कथा चित्रित केली होती. दोन तास बावीस मिनिटांच्या या चित्रपटात कर्नल इंगळे, कु. दिलीप, नानासाहेब फाटक, जयश्री, मीना, सौ. शिलोत्री व राजा पंडीत अशा अनेक कलाकारांनी उत्तम अभिनय करुन चित्रपट यशस्वी केला.[१२४] या चित्रपटानंतर मात्र संस्थेने इतर कोणताही चित्रपट निर्मित केल्याचा उल्लेख नाही.

" प्रभा चित्र - ची चित्रपट निर्मिती :

कोल्हापूरात पहिली बालनट - नटींची चित्रपट संस्था स्थापन करण्याचे श्रेय राजा पंडीत यांच्याकडे जाते.[१२५] या संस्थेच्या स्थापनेच्या तारखे - बद्दल निश्चित अशी माहिती मिळत नसली तरी, संस्थेने सोळा वर्षाखालील

मुले - मुली असणारा " ध्रुव " हा पहिलाच चित्रपट १९३८ साली निर्मित केला. डी. के. काळे यांनी दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटाद्वारे सुर्यकांत मांडरे यांनी पहिल्यांदा चित्रपट सृष्टीत पाऊल ठेवले. ध्रुव बाळाची कथा असणा-या या पौराणिक चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, स. अ. शुक्ल यांनी लिहीले. यातील सुंदर गीतेदेखील शुक्ल, राजा पंडित व वि. स. खांडेकर यांनी रचली तर त्यांना गोड चाली लावून संगीत देण्याचे काम आण्णासाहेब माईणकर यांनी केले. वासुदेव कर्नाटकींची छायाचित्रण, ध्वनी गणपत मोळे यांचा, तर चित्रपटाचे कला दिग्दर्शन रतनसिंह रजपूत यांनी केले. बालकराम, लीना फाटक, इंदू मिस्त्री, शांता चौगुले, बाळू महाडीक, मुमताज या १६ वर्षा - खालील अनेक बालकलाकारांनी यात भूमिका केल्या. [१२६] दहा गीतांनी परिपूर्ण अशा या चित्रपटाचा वेळ अडीच तास इतका होता. [127]

" हंस चित्र " ने आपल्या पुढील चित्रपटासाठी " ब्रम्हचारी " या विनोदी कथेची १९३८ साली निवड केली. [१२८] या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद व गीते देखील अत्रे यांनी लिहीली, तर या गीतांना मधुर संगीत दादा चांदेकर यांनी दिले. चित्रपटाच्या निर्मितीतील रसायनाचा अत्यंत महत्वाचा विभाग गोपाळ कांबळे यांनी सांभाळला. रंगभूषा व वेशभूषा ही देखील महत्वाची खाती अनुक्रमे शंकर गौड व विश्वास यांनी सांभाळली. कलादिग्दर्शन पळणीटकर यांनी केले. मुंबईच्या एच. एम. व्ही. रेकॉर्ड कंपनीने या चित्रपटाच्या गीतांची ध्वनिमुद्रीका काढल्या. गीते होती नऊ. मा. विनायकांनी नायकाच्या भूमिके बरोबरच चित्रपटाचे दिग्दर्शन केले व नायिकेच्या भूमिकेत मिनाक्षी या अभिनेत्रीची निवड करण्यात आली होती. या व्यतिरिक्त दादा साळवी, जोग, दामूआण्णा मालवणकर, जावडेकर व नूरजहाँ या कलाकारानीही या सामाजिक आशयाच्या विनोदी चित्रपटात उत्तम अभिनयाचे प्रदर्शन केले. [१२९] १५३ मिनिटांच्या या चित्रपटात

ब्रम्हचारी राहण्याची शपथ घेतलेल्या व नंतर प्रेमात पडलेल्या औदुंबर या तरुणाची कथा निवडण्यात आली.[१३०]

१९३८ " प्रभा चित्र " ने सादर केलेल्या ध्रुव या पौराणिक विषयावरच " शालिनी सिनेटोन " नेही १९३८ ला " ध्रुवकुमार " या चित्रपटाची निर्मिती केली.[१३१] के.पी.भावे दिग्दर्शित ध्रुवकुमार ची कथा, पटकथा, संवाद याचे लेखन सुप्रसिध्द साहित्यिक ना.ह.आपटे यांनी केले. प.स.देसाई यांच्या गीतांना विश्वनाथबुवा जाधव यांनी संगीतबध्द केले. कला दिग्दर्शनात नामवंत असलेल्या गणपत वडणगेकर यांनी या चित्रपटाचे कला दिग्दर्शन केले. " शालिनी सिनेटोन " च्या पूर्वीच्या चित्रपटात छायाचित्रण केलेल्या के. व्ही.माचवे यांनी याही चित्रपटाचे छायाचित्रण केले. चित्रपटातील ध्वनि विभाग या महत्वाच्या खात्याचे काम श्रीखंडे यांनी पाहिले. आपल्या भूमिकेद्वारे चित्रपट परिणामकारक करण्याचे काम कुमार प्रभाकर, कुमार मनोहर वैशंपायन, वेदपाठक, इंदिरा वाडकर, इंदूबाला, सोनुबाई, राजा परांजपे, रोहिणी या अनेक कलाकारांनी केले.[१३२] चौदा गीतांचा समावेश असलेल्या या चित्रपटाचा अवधी अडीच तास, अकरा मिनिटे होता.[१३३]

" शालिनी सिनेटोन " या संस्थेच्या " प्रतिभा " या चित्रपटानंतर संस्थेतील दरबारी नोकरांच्या हस्तक्षेप करण्याच्या वृत्तीमुळे बाबूराव पेंटर यांनी संस्था सोडल्याचा उल्लेख सापडतो.[१३४] " शालिनी सिनेटोन " ची बरीचशी भिस्त बाबूराव पेंटर यांच्यावर असल्याने त्यांनी संस्था सोडल्यावर हळूहळू संस्था बंद होण्याच्या मार्गाला लागली व संस्थेने चित्र - निर्मिती बंद केली.

१९३८ साली " ज्वाला " या पोशाखी चित्रपटाची " हंस चित्र " ने

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निर्मिती केली. हंसच्या चित्रपटाचे दिग्दर्शन करणाऱ्या मा. विनायक या सुप्रसिध्द दिग्दर्शकाने या चित्रपटाचेही दिग्दर्शन केले.[१३५] संकलनाची महत्वाची कामगिरी जुन्नरकर व विठ्ठल बनकर यांनी पार पाडली. चित्रपटातील सहा गीतांना खाँ साहेब धम्मनखा यांनी संगीत दिले. अंगार नावाच्या राजद्रोही सेनापतीच्या जीवनावरील या चित्रपटाची कथा, संवाद व गीते वि. स. खांडेकर या नामवंत लेखकाने लिहीली. छायाचित्रण हंस चे सुप्रसिध्द छायाचित्रकार पांडुरंगराव नाईक यांनी केले. चित्रपटातील मुख्य भूमिका व गोड पार्श्वगायन रत्नमाला या गायक अभिनेत्रीने केले. याशिवाय हिंदीतील चंद्रमोहन या अभिनेत्याची निवड केली होती. चंद्रकांत, आशालता, बुलबुले, दळवे या कलाकारांबरोबरच मा. विनायक यांनीदेखील चित्रपटात उत्तम भूमिका केल्या. रंगभूषा व वेशभूषा शंकर गौड व विश्वास यांनी अत्यंत चांगल्या रितीने केल्या. १६१ मिनिटांच्या या चित्रपटात ध्वनिविभाग मोडक यांनी सांभाळला, व कलादिग्दर्शन पळणीटकर यांनी केले.[१३६] जगप्रसिध्द नाटककार शेक्सपीअरच्या मॅकबेथ या नाटकावर आधारीत या एकमेव मराठी चित्रपटाच्या मराठी व हिंदी दोन्ही आवृत्या प्रदर्शित झाला.[१३७]

" महाराष्ट्र पिक्चर्स " ची चित्रपट निर्मिती :

१९३९ सालाची " महाराष्ट्र पिक्चर्स " या चित्रपट संस्थेने " बाजीप्रभू देशपांडे " या ऐतिहासिक व्यक्तिरेखेवरील चित्रपट प्रदर्शित केला, ज्याचे दिग्दर्शन बाळासाहेब यादवांनी केले.[१३८] या संस्थेच्या स्थापनेबाबत इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही. बाळासाहेब यांनी यांनी स्वत: दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात त्यांनीच मुख्य भूमिकादेखील केली होती.

झुंझारराव पवार, गणपत बकरे, नूरजहाँ, बापूसाहेब पवार व अहमदखान यांची देखील चित्रपटातील भूमिकांसाठी निवड केली होती. दोन तास चोवीस मिनिटाच्या या चित्रपटात नऊ गीते होती. [१३९]

१९३९ साली " हंस पिक्चर्स " ने आपल्या पुढील चित्रपटासाठी " ब्रँडीची बाटली " हे विनोदी शिर्षक असलेले कथानक निवडले. " ब्रँडीकी बोतल " या नांवाने हिंदी आवृत्ती प्रदर्शित झाली. [१४०] सुप्रसिध्द साहित्यिक प्र. के. अत्रे यांनी कथा, पटकथा, संवाद व गीते लिहून चित्रपट यशस्वी करण्यास मदत केली. दादा चांदेकर यांनी संगीतबध्द केलेल्या या चित्रपटात दहा गीते होती. दिग्दर्शनाचे काम " हंस " चे यशस्वी दिग्दर्शक मा. विनायक यांनी केली. पांडुरंग नाईक यांनी छायाचित्रण केलेल्या या चित्रपटाचे संकलन माधव कांबळे यांनी केले. रसायन विभाग "हंस" च्याच गोपाळराव कांबळे यांनी नेहमीप्रमाणेच यशस्वीरित्या सांभाळले. दामुआण्णा मालवणकर, विष्णुपंत जोग, मिनाक्षी, दादा साळवी, वेदपाठक व शकुंतला यांनी भूमिका केलेल्या या चित्रपटाची रंगभूषा शंकर गौड व वेशभूषा विश्वास यांनी केली. सरदार वल्लभभाई पटेल यांनी सहकार्य देऊन, आपली कांही दृश्ये चित्रपटात घेण्यास अनुमती दर्शविली. [१४१] बगाराम या दारूबंदीच्या मोहिमेत उतरलेल्या नगरपालिकेतील कारकुनाच्या सामाजिक आशयाच्या विनोदी कथेवर या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले. कालावधी होता १४८ मिनिटे. [१४२]

" हंस " ने आपल्या पुढील चित्रपटासाठी सामाजिक कथेची निवड केली. १९३९ ला सादर केलेल्या मा. विनायक दिग्दर्शित " देवता " या चित्रपटाची कथा वि. स. खांडेकर यांनी लिहीली होती. पटकथा व संवाद लिहीण्याची जबाबदारीही त्यांनीच सांभाळली. इतकेच नव्हेतर चित्रपटाचे

गीतलेखन देखील त्यांनीच केले. गीत लेखनात भा. रा. तांबे या कवीनेदेखील हातभार लावला. [१४३] नायकाची भूमिका बाबूराव पेंढारकर यांनी केली. [१४४] नायिकेची भूमिका मिनाक्षी यांनी केली. याशिवाय इंदिरा वाडकर, दादा साळवी, दामुआण्णा मालवणकर, सरदार, विभावरी व बेबी विमल या कलाकारांनी निरनिराळया भूमिका केल्या. नऊ गाणी असलेल्या या चित्रपटास संगीत देण्याचे काम दादा चांदेकर यांनी केले. छायाचित्रण, संकलन, रंगभूषा व वेशभूषा याचप्रमाणे रसायन ही सर्व खाती नेहमीप्रमाणे " हंस " च्या अनुक्रमे पांडुरंगराव नाईक, कांबळे, गौड, विश्वास व गोपाळ कांबळे यांनी यशस्वीरित्या सांभाळली. कला दिग्दर्शन पळणीटकर व ध्वनि अहलुवालिया यांचे होते. विधुराशी विवाह केलेल्या सुशिलेच्या कथेवर आधारीत या चित्रपटाचा अवधी दोन तास एकोणतीस मिनिटे इतका होता. [१४५]

१९३९ साली " प्रभात चित्र " या संस्थेने " मायाबाजार " या पौराणिक कथेची निवड केली. [१४६] राजा पंडित यांनी स्वत: अभिनय केलेल्या या चित्रपटात मा. सुरेश, पंडितराव नगरकर, सॅण्डो, गोविंद कुरवाळीकर हे पुरुष कलाकार आणि शशिकला, शामाबाई, इंदूमती मेस्त्री, रंभाराणी व रोहिणी या स्त्री कलाकारांची निवड करण्यात आली. बाबूराव लिमये यांनी संकलित केलेल्या या चित्रपटाच्या कथा, संवाद व पटकथा लेखनाचे काम ना. वि. कुलकर्णी यांनी केले. जी. पी. पवार यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटास पंडित नगरकर यांनी संगीत दिले. तेरा गीते असलेल्या या चित्रपटात कला दिग्दर्शन शंकरराव शिंदे, ध्वनि जोशी व छायाचित्रण माचवे यांचे होते. [१४७] दोन तास चौदा मिनिटांचा कालावधी असणारा हा चित्रपट होता. [१४८]

१९३९ च्या वर्षाचा शेवट " हंस चित्र " ने " सुखाचा शोध " या सामाजिक चित्रपटानेच केला. आठ गीते असलेल्या या चित्रपटाच्या कथा, पटकथा, संवाद व गीते लिखाणाचे काम वि. स. खांडेकर यांनी स्वत: केले. गीत लेखनास मागील चित्रपटाप्रमाणे भा. रा. तांबे यांनी मदत केली. कवी यशवंत यांनीदेखील या चित्रपटातील गीत लेखनाचे काम केले. पार्श्वनाथ आळतेकर दिग्दर्शित या चित्रपटास के. दत्ता यांनी संगीत दिले. कला दिग्दर्शन वाटेगांवकर, ध्वनि गणपतराव भोळे यांनी, तर रंगभूषा व वेशभूषा शंकर गौड व विश्वास यांनी केली. पांडुरंगराव नाईक यांचे छायाचित्रण असणाऱ्या या चित्रपटात बाबूराव पेंढारकर यांनी नायकाची तर मिनाक्षी यांनी नायिकेची भूमिका केली. या दोन कलाकारां व्यतिरिक्त उषा मंत्री, शांता ठकार, दामुआण्णा मालवणकर, दादा साळवी, विमल सरदेसाई, गिरीश व जोग या कलाकारांनीदेखील भूमिका करून चित्रपट यशस्वी केला. मराठी बरोबरच हिंदीतही हा चित्रपट " मेरा हक " या नांवाने काढला गेला.[१४९] या चित्रपटाचा कालावधी १३८ मिनिटे इतका होता.[१५०]

१९४० सालची सुरुवात " हंस चित्र " ने " अर्धांगी " या विनोदी सामाजिक चित्राने केली, मुख्य भूमिकेबरोबरच दिग्दर्शनाचे महत्वाचे काम मा. विनायक यांनी केले. पांडुरंग नाईक यांचे छायाचित्रण असणाऱ्या या चित्रपटात वाटेगांवकर यांनी कलादिग्दर्शन विभाग सांभाळला. आचार्य अत्रे यांनी कथा, पटकथा, संवाद व गीतलेखन केले. ध्वनिविभाग जी. भोळे व संगीत विभाग दादा चांदेकर यांनी यशस्वी केला. मा. विनायक, मिनाक्षी, लीला चिटणीस व बाबूराव पेंढारकर यांनी या चित्रपटात प्रमुख भूमिका केल्या.

एच्. एम्. व्ही. कंपनीने ध्वनिमुद्रीका काढलेल्या या चित्रपटात आठ

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गीते होती. " घर की रानी " ही हिंदी आवृत्तीही " हंस " ने सादर केली.[१५१] या चित्रपटाचा कालावधी दोन तास तेहतीस मिनिटे इतका होता.[१५२] या चित्रपटानंतर " हंस चित्र " चे रुपांतर १९४० मध्ये " नवयुग चित्रपट लिमिटेड " या संस्थेत झाले होते, जिचे मुख्य कार्यालय पुण्यास होते.[१५३]

## " प्रगती पिक्चर्स " ची निर्मिती :

" प्रगती पिक्चर्स " चा " अयोध्येची राणी " हा चित्रपट १९४० साली निर्माण झाला.[१५४] पण या संस्थेची स्थापना कोणत्या साली झाली, याची माहिती उपलब्ध संदर्भ साधनात मिळत नाही. हा पौराणिक चित्रपट १९४१ साली " भरत भेट " या नावाने अभ्यवेक्षण मंडळाकडून मंजूर झाला, पण " प्रकाश " या संस्थेने याच नावाचा चित्रपट काढल्याने नावाची द्विरुक्ती टाळण्यासाठी " भरत भेट " हे नांव गाळण्यात आले.[१५५] दोन तास अठ्ठावीस मिनिटाच्या या चित्रपटात सदाशिव कुलकर्णी, मनोहर घटवाई, आशालता व रोहिणी यांनी भूमिका केल्या. सात गीते असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन के.पी.भावेंनी केले.[१५६]

## " माय पिक्चर्स " ची चित्रपट निर्मिती :

१९४० साली आण्णासाहेब राजोपाध्ये या बाबूराव पेंटर यांच्या जुन्या सहका-याने " माय पिक्चर्स " नावाची चित्रपट संस्था स्थापन करुन " शालिनी " च्या चित्रपट निर्मितीगृहात " मोहिनी " उर्फ " एकादशी महात्म्य " या पौराणिक चित्रपटाच्या चित्रिकरणास सुरुवात केली.[१५७] राजोपाध्ये यांनी बावडेकर यांच्या सहाय्याने दिग्दर्शित

केलेल्या या चित्रपटात उषा मंत्री, मा. विठ्ठल, अमीना, सुरेश परदेशी, करमरकर, सुरेखा यांनी भूमिका केल्या. कवी यशवंत यांची कथा, पटकथा, संवाद व गीते असणारा हा पहिलाच चित्रपट होय. मोहिनी नावाची अप्सरा व विदेशाचा राजा यांची कथा असलेल्या या पोशाखपटात सात गीते व चित्रपटाचा वेळ ११० मिनिटे होता. संगीत जाधव यांनी दिले व छायाचित्रण माचवे यांनी केले. [१५८] कोल्हापूरात चित्रपटगृहांची संख्या हळूहळू वाढू लागली, १९३८ साली कोल्हापूरात पाच चित्रपटगृहे होती. [१५९]

## १९४० च्या दशकातील चित्रपट निर्मिती :

१९४१ या सालामध्ये कोल्हापूरात कोणत्याही चित्रपटाची निर्मिती झाल्याचा उल्लेख नाही. १९४२ साली मात्र " न्यू हंस पिक्चर्स " या संस्थेने पहिला चित्रपट सादर केला. [१६०]

## " न्यू हंस पिक्चर्स " ची स्थापना :

" नवयुग चित्रपट लिमिटेड " या चित्रपट संस्थेतून बाहेर पडल्यावर बाबूराव पेंढारकर यांनी १९४१ मध्ये " न्यू हंस पिक्चर्स " या चित्रपट संस्थेची स्थापना केली. [१६१]

" पहिला पाळणा " या सामाजिक कथा असलेल्या चित्रपटाची निर्मिती करण्याचे बाबूराव पेंढारकर यांनी ठरविले. गीतलेखक ग. दी. माडगुळकर याचे पहिले चित्रगीत या चित्रपटात होते. या गीतांना सी. बालाजी यांनी संगीतबध्द केले. सुप्रसिध्द लेखक व दिग्दर्शक विश्राम बेडेकर यांनी कथा, पटकथा, संवाद लिखाणाचे व दिग्दर्शनाचेही काम केले. ग. दी. माडगुळकरांबरोबरच

बोबडे यांनी गीतलेखन केलेल्या या चित्रपटाचा ध्वनिविभाग गणपत मोठे व कलादिग्दर्शन विभाग वाटेगांवकर यांच्याकडे होता. पांडुरंगराव नाईक यांनी छायाचित्रीत केलेल्या या चित्रपटात शांता हुबळीकर, इंदू नातू, बाळाबाई, स्वत: ग. दि. माडगुळकर व बाबूराव पेंढारकर यांनी भूमिका केल्या.[१६२] १२ गीते असलेल्या या चित्रपटाचा कालावधी सव्वा दोन तास होता. लहान मुलांची आवड नसलेल्या चित्रा या सुशिक्षित तरुणीचे हृदय परिवर्तन दर्शविणारा हा चित्रपट होता.[१६३] याच वर्षी " हंस पिक्चर्स " ने " भक्त दामाजी " हा संतपट सादर केला. शमीम भगत यांनी संकलित केलेल्या या चित्रपटात वेशभूषा घाणेकर व रंगभूषा दिनकर जाधव यांनी केली होती. चित्रपटाचे कला दिग्दर्शन बाळ गजबर यांनी केले होते. कथा, पटकथा, संवाद, याबरोबरच दिग्दर्शनाची जबाबदारीही भालजी पेंढारकर यांनी पार पाडली. ग. दि. माडगुळकर यांच्या गीतांना श्रीधर पारसेकर यांनी संगीत दिले. छायाचित्रण केले होते पांडुरंग नाईक यांनी. लिला चंद्रगिरी, ललिता पवार, कुसुम देशपांडे, गंगाधर लोंढे, शेटे, झुंझारराव पवार व स्वत: बाबूराव पेंढारकर यांनी देखील भूमिका केलेल्या या चित्रपटात आठ गीते होते.[१६४] दोन तास दोन मिनिटे इतका अवधी असणाऱ्या या चित्रपटाची कथा विठ्ठल भक्त संत दामाजी यांच्या जीवनावर आधारीत होती.[१६५]

## " प्रभाकर पिक्चर्स " ची स्थापना :

आतापर्यंत पुण्यात " फेमस आर्ट पिक्चर्स " तर्फे चित्रपट निर्मिती करणाऱ्या भालजी पेंढारकरांना त्यावेळी पुण्यात मलेरियाची साथ असल्याने मलेरिया झाला. प्रकृती खराब झाल्याने ते कोल्हापूरास आले. त्यांनी

१९४१ साली कोल्हापूरात " प्रभाकर पिक्चर्स " ची स्थापना केली. [१६६]

१९४३ साली " प्रभाकर पिक्चर्स " या संस्थेचा " बहिर्जी नाईक " हा ऐतिहासिक चित्रपट भालजी पेंढारकर यांनी निर्मिला. निर्मितीबरोबरच दिग्दर्शन, कथा, पटकथा व संवाद या सर्व बाजू त्यांनी सांभाळल्या. कोतमिरे यांनी संकलित केलेल्या या चित्रपटात छायाचित्रण बाजू साजू नाईक यांचे होते. टेंबे व कशाळकर यांनी मधुर संगीत दिलेल्या या चित्रपटात आठ गीते होती. जी. एलू. भोळे यांनी ध्वनि व टेरे, जाधव यांनी कलादिग्दर्शन विभाग सांभाळला. [१६७] ग. दि. माडगुळकर यांची गीते असलेला हा चित्रपट एक तास अठ्ठावन्न मिनिटांचा होता. [१६८] शिवाजी महाराजांच्या शूर सरदाराच्या जीवनावर आधारीत " बहिर्जी नाईक " या चित्रपटात गणपत बकरे, मा. विठ्ठल, सुर्यकांत मांडरे, माडगुळकर यांनी पुरुष भूमिका, तर शांता जाधव, विमल कर्नाटकी यांनी स्त्री भूमिका केल्या. [१६९]

" प्रफुल्ल चित्र " ची स्थापना :

मा. विनायक यांनी १९४२ साली कोल्हापूर येथे " प्रफुल्ल चित्र " नावाची चित्रपट संस्था स्थापन केली. [१७०] " माझं बाळ " या सामाजिक कथेची निवड करुन १९४३ ला संस्थेचा पहिला चित्रपट निर्मिला. [१७१] स्वत: मा. विनायक यांनी निर्मिती व दिग्दर्शन केले. दत्ता डावजेकर यांचे संगीत असणा-या या चित्रपटात सात गीते होती. सुप्रसिध्द साहित्यिक वि. स. खांडेकर व माधव ज्युलियन यांनी गीतांची रचना केली. त्याचप्रमाणे कथा, पटकथा व संवाद वि. स. खांडेकर यांनीच लिहीले. माधव बुलबुले यांची छायाचित्रण असलेल्या या चित्रपटात विष्णूपंत चव्हाण यांनी ध्वनिमुद्रण केले. कलादिग्दर्शन सदाशिव गायकवाड यांनी केले. मा. विनायक यांनीच यात

नायकाचे काम केले. दादा साळवी, मिनाक्षी, दामुआण्णा मालवणकर, दातार, रेणुका व गायिका लता मंगेशकर यांनी या चित्रपटात भूमिका केल्या.[१७२] कुमारी मातेच्या समस्येवर आधारीत या चित्रपटाचा कालावधी दोन तास तीन मिनिटे इतका होता.[१७३]

१९४३ साली " प्रफुल्ल चित्र " ने आपल्या पुढील चित्रपटासाठी सामाजिक विषयाची निवड केली. " चिमुकला संसार " या चित्रपटात मंदा व विश्वास यांच्या प्रेम विवाहाची व त्यानंतर येणा-या समस्यांची कथा असणा-या या चित्रपटात मिनाक्षी, दातार, मा.विनायक, लता मंगेशकर, श्रीपाद जोशी, दामुआण्णा मालवणकर व रेणुका या " माझं बाळ " मधील कलाकारानी भूमिका केल्या होत्या.[१७४] बाबूराव गोखले यांची आठ गीते असणा-या व वसंत जोगळेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटाची कथा व्ही.व्ही.बोकील यांनी लिहीली होती. त्यांनी संवाद लेखनाचेही काम केले होते. दत्ता डावजेकर यांचे संगीत असलेल्या या चित्रपटाचे ध्वनिमुद्रण व्ही.चव्हाण व छायाचित्रण माचवे यांनी केले. चित्रपटाचे कलादिग्दर्शन बापू पवार व संकलन माधव कांबळे यांनी केले होते. सुलोचना या अभिनेत्रीचा हा पहिलाच चित्रपट होय.[१७५] या चित्रपटाचा कालावधीही " माझं बाळ " या चित्रपटा इतकाच होता.[१७६]

" न्यु हंस " या चित्रपट संस्थेने १९४३ साली एका सामाजिक विषयावरील चित्रपट निर्मिती करावयाचे ठरविले. " पैसा बोलतो आहे " ही मराठी व " नगद नारायण " ही हिंदी आवृत्ती विश्राम बेडेकर यांनी दिग्दर्शित केली.[१७७] त्यांचीच कथा, पटकथा व संवाद असणा-या या चित्रपटाची निर्मिती बाबूराव पेंढारकर यांनी केली. श्रीधर पार्सेकर यांचे कर्णमधुर संगीत असणा-या या चित्रपटातील आठ गीते ग.दि.माडगुळकर व

स. अ. शुक्ल यांनी रचली. सरस्वती माने, राजकुमारी, कृष्णराव चोणकर व सदाशिव नेवेंकर यांनी आपल्या गोड आवाजात यातील पार्श्वगायन केले. दोन तास दोन मिनिटांच्या या चित्रपटात बाबूराव पेंढारकरांनी लालनाथ ची भूमिका केली, तर कुसुम देशपांडे, नायमपल्ली व सामंत हे इतर कलावंतही चित्रपटात चमकले. पैसा हेच सर्वस्व मानणा-या एका गृहस्थाची व त्याच्या विरुध्द मताचा त्याचा मुलगा यांची कथा या चित्रपटात होती. [१७८] कलादिग्दर्शनाचे कलात्मक काम जाधव यांनी केले तर शमीम भागवत यांनी संकलक म्हणून काम केले. ध्वनिमुद्रण ए. परमार व इरच यांनी केलेल्या चित्रपटाचे पांडुरंगराव नाईक यांची छायाचित्रण केले. [१७९]

" प्रफुल्ल चित्र " ने १९४४ सालाची सुरुवात " गजाभाऊ " या सामाजिक चित्रपटाने केली. [१८०] निर्मिती व दिग्दर्शन मा. विनायकांनी स्वत: केलेल्या या चित्रपटातील वेशभूषा व रंगभूषा विश्वास व भाऊराव दातार यांनी केल्या. स. आ. शुक्ल यांची पटकथा व संवाद असणा-या या चित्रपटाची कथा चं. वि. बावडेकर यांनी लिहीली. [१८१] चित्रपटात नृत्यालादेखील महत्व असल्याने वसंत पागे यांनी नृत्यदिग्दर्शन केले. नऊ गीते असणा-या चित्रपटातील गाणी स. अ. शुक्ल व पंडित इंद्र यांनी लिहीली. वासुदेव कर्नाटकी यांचे छायाचित्रण असणा-या या चित्रपटातील विशेष चित्रण माधव शिंदे यांनी केले. कलादिग्दर्शन सदाशिव गायकवाड यांनी केले. ध्वनिमुद्रणाची महत्वाची जबाबदारी आप्पासाहेब जाधव यांनी पार पाडली. दत्ता डावजेकर यांनी संगीतबध्द केलेल्या या चित्रपटाचे संकलन माधव कांबळे यांनी केले. " प्रफुल्ल चित्र " च्या दामुआण्णा मालवणकर, दादा साळवी, विष्णूपंत जोग, सुमती गुप्ते, नलिनी, बेबी आचरेकर व ग. दि. माडगुळकर या नामवंत कलाकारांनी यातील भूमिका उत्तम रितीने निभावल्या. [१८२] या चित्रपटाचा कालावधी दोन तास तीन मिनिटे होता व यात गजाभाऊ व त्यांची कन्या सुमित्रा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यांची झालेली ताटातूट व परत भेट याचे चित्रिकरण करण्यात आले होते.[१८३]

१९४५ साली कोणताही मराठी चित्रपट प्रदर्शित झाल्याचा उल्लेख संदर्भ साधनात उपलब्ध नाही.

" प्रभाकर पिक्चर्स " ने १९४६ साली एक सामाजिक चित्रपट प्रदर्शित करायचे ठरविले व त्यानुसार " सासुरवास " हा भालजी पेंढारकर दिग्दर्शित चित्रपट १९४६ ला सादर झाला.[१८४] याची कथा, पटकथा व संवाद देखील भालजी पेंढारकर यांनीच लिहीले. झुंझारराव या जहागिरदार व त्यांचा मुलगा, सून यांची कथा असणा-या या चित्रपटात चिंतामणराव कोल्हटकर, मा. विठ्ठल, जयशंकर दानवे, राजा परांजपे, सुशांता, सुलोचना, लीला जोशी, सुर्यकांत व वसंत शिंदे या अनेक कलावंतांनी भूमिका करून चित्रपट यशस्वी केला. शंकर व्यास यांनी संगीत दिलेल्या या चित्रपटातील गीते भालजी पेंढारकर यांनीच स्वरबध्द केली. गीतांची संख्या सात होती. गीतलेखनात मधुकर कुलकर्णी यांनीदेखील हातभार लावला. वासुदेव कर्नाटकी यांनी छायाचित्रण व टेरे, गोलिवडेकर यांनी कलादिग्दर्शन केले. ध्वनिमुद्रण जी. भोळे यांनी केलेल्या " सासुरवास " या चित्रपटाचे संकलन करण्याचे महत्वाचे काम शेळके व गायकवाड यांनी केले.[१८५] या चित्रपटाचा अवधीदेखील " गजाभाऊ " या चित्रपटा इतका म्हणजे दोन तास तीन मिनिटे इतका होता[१८६]

१९४७ साली प्रभाकर पिक्चर्स ने " जय भवानी " हा ऐतिहासिक कल्पनेवर आधारीत चित्रपट प्रकाशित केला. कथा, पटकथा, संवाद व गीते लिहीण्याचे काम भालजी पेंढारकर यांनी अत्यंत यशस्वीपणे केले.[१८७] चित्रपटातील सात गीतांना मधुर संगीत देण्याचे काम सी. बालाजी यांनी केले. "येगं येगं फुलंवाली" सारखी श्रवणीय गीते अतिशय प्रसिध्द झाली. जयशंकर दानवे यांनी भूमिके बरोबरच दिग्दर्शनही केले. शिंदे व वासुदेव कर्नाटकी यांनी

छायाचित्रीत केलेल्या या चित्रपटाचे कलादिग्दर्शन टेरे यांनी समाधानकारक केले. सुर्यकांत, मा. विठ्ठल व सुलोचना यांच्या मुख्य भूमिका असणा-या या चित्रपटात कुटे, वसंत शिंदे, बर्ची बहाद्दर, शीला, अंजनी व लिला जोशी या प्रभाकर पिक्चर्स च्या अनेक कलाकारांनी सुंदर अभिनयाचे दर्शन घडविले.[१८८] ध्वनिमुद्रण म्हामूलकर व संकलन गायकवाड यांनी केलेल्या या चित्रपटाचा वेळ एक तास छप्पन मिनिटे इतका होता. सर्जेराव या शिवाजी महाराजांच्या निष्ठावान सरदाराच्या व्यक्तिरेखेवर हा चित्रपट चित्रित केला होता.[१८९]

" मंगल पिक्चर्स " ची स्थापना :

कोल्हापूरात " हंस पिक्चर्स " मध्ये असणारे वामनराव कुलकर्णी आणि विष्णूपंत चव्हाण यांनी बाबूराव पेंढारकर यांच्या मदतीने " मंगल पिक्चर्स " ची स्थापना करून १९४७ साली " जय मल्हार " या ग्रामीण चित्रपटाचे प्रदर्शन केले. ही चित्रपट संस्था १९४६ सालीच्या दरम्यान स्थापन झाली व द. स. अंबपकर यांनी संस्थेच्या पहिल्या चित्रपटाचे दिग्दर्शन केले.[१९०] दोन तास दहा मिनिटांच्या या चित्रपटातील दहा भावपूर्ण गीतांना दादा चांदेकर या सुप्रसिध्द संगीतकाराने संगीत दिले. ग. दि. माडगुळकर यांनी लिहीलेल्या या चित्रपटातील रंगभूषा राम यादव यांनी केली. सुत्रधार बाबूराव पेंढारकर असणा-या या चित्रपटाचे संकलन बाळ घाटगे यांनी केले. दिनकर द. पाटील या नवोदित लेखकास कथा व संवाद लिहीण्याची संधी दिली तर व्ही. चव्हाण यांना ध्वनिमुद्रणाची संधी देण्यात आली. बापू पवार यांनी कलादिग्दर्शन केलेल्या या ग्रामीण चित्रपटाचे छायाचित्रण शिंदे यांनी केले.[१९१] कल्लू बेरडाचे पात्र बाबूराव पेंढारकर यांनी स्वत: रंगविले.[१९२] चंद्रकांत मांडरे, ललिता पवार यांना वेगळयाच धाटणीच्या भूमिका देण्यात आल्या. याशिवाय माडगुळकर, अंबपकर, जोग, झुंझारराव

पवार, सरस्वती बोडस, विमल अशा अनेक कलावंतांनी उत्कृष्ट भूमिका केल्या. " जय मल्हार " मध्ये " माझ्या व्हटाचं डाळींब फुटलं " यासारख्या लोकप्रिय लावण्या होत्या. त्याचप्रमाण " मंगल पिक्चर्स " च्या पुढील मराठी चित्रपटांची निर्मित पुण्यास व्हायला सुरूवात झाली. [१९३]

सामाजिक चित्रपटांच्या शृंखलेतील १९४९ साली " प्रभाकर पिक्चर्स " ने " मीठ भाकर " हा चित्रपट सादर केला. दोन तास पाच मिनिटांच्या या चित्रपटात सात गीते होती. कुटुंबातील एका मुलावर आलेला खुनाचा आरोप व त्यातून मुक्तता, अशी कथा असणा-या या चित्रपटाचे संकलन गायकवाड व निकम यांनी उत्तमरितीने केले. [१९४] सुलोचना, चंद्रकांत, मा. विठ्ठल, जयशंकर दानवे, एस्. प्रभाकर, झुंझारराव पवार, अंजली, सरला व भालजींची कन्या सरोज या अनेक कलाकारांनी यात भूमिका करून चित्रपट परिपूर्ण बनविला. निर्मिती, दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद व गीतलेखन हे सहा विभाग स्वत: भालजी पेंढारकर यांनी यशस्वीरित्या सांभाळले. दिनकर जाधव यांनी रंगभूषा व विश्वास, नारायणराव यांची वेशभूषा या चित्रपटात होती. मोडक, जाधव यांनी ध्वनिमुद्रण केलेल्या या चित्रपटाचे छायाचित्रण शिंदे व स्थिरचित्रण दादा गजबर यांनी कलात्मक रितीने केले. कशाळकर यांचे संगीत व निळकंठ देरे व मिस्त्री यांचे कला दिग्दर्शन या सर्व गोष्टींमुळे चित्रपट यशस्वी होण्यास मदत झाली. [१९५]

१९४९ साली आपल्या पुढील चित्रपटासाठी " प्रभाकर पिक्चर्स " च्या भालजी पेंढारकर यांनी ऐतिहासिक विषय निवडला. [१९६] " शिलंगणाचं सोनं " या शिवछत्रपतींच्या जीवनातील एका प्रसंगावर आधारीत या ऐतिहासिक चित्रपटात हंसा वाडकर, शांता आपटे, बाबूराव

पेंढारकर, मा. विठ्ठल, सुलोचना, लिला. दानवे, जयशंकर, अंजनी, सुर्यकांत, इब्राहिम लाटकर या अनेक नामवंत व लोकप्रिय कलाकारांनी अभिनय केला. दोन तास एकवीस मिनिटांच्या या चित्रपटातील आठ गीते लक्ष्मण बेरळेकर यांची संगीतबध्द केलेली होती. [१९७] " एक वाणी, एक वचनी " या - सारखी अर्थपूर्ण गाणी अत्यंत लोकप्रिय झाली. निर्मिती, दिग्दर्शन, कथा, संवाद व गीते या सर्व बाजू नेहमीप्रमाणेच भालजी पेंढारकरांनी कौशल्याने सांभाळल्या. भोसलेंनी संकलन केले, तर गणपत शिंदे यांनी छायाचित्रण केले. रंगभूषा हे महत्वाचे खाते दिनकर यांनी सांभाळले, तर वेशभूषा विश्वास व नारायणराव यांनी विषयाला अनुरुप अशीच केली. ध्वनिमुद्रणाची जबाबदारी जाधव व मोडक यांनी सांभाळली व सर्व कलाकार, तंत्रज्ञांच्या मेहनतीमुळे " शिलंगणाचं सोनं " हा चित्रपट यशस्वी झाला. [१९८]

या दशकात कोल्हापूरात आणखी एका चित्रपटगृहाची भर पडली. १९४३ साली कोल्हापूरात सहा चित्रपटगृहे कार्यरत होती. [१९९]

१९३२ ते १९४९ या काळातील चित्रपट निर्मितीचा आढावा घेताना कोल्हापूरसह संपूर्ण महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, सांगली व नासिक येथील चित्रपटसंस्थांनी जवळजवळ एकशे पंचावन्न मराठी चित्रपटांची निर्मिती केल्याचे दिसून येते. सर्वात जास्त चित्रपट, म्हणजे छप्पन चित्रपट पुण्यात निर्माण झाले, त्याखालोखाल मुंबई येथे सत्तेचाळीस, कोल्हापूर येथे सेहेचाळीस चित्रपटांची निर्मिती झाली. त्या सेहेचाळीस मधील दोन चित्रपट पुणे व मुंबई येथे चित्रित केले गेले. या व्यतिरिक्त सांगली येथे पाच व नासिकच्या संस्थांनी एका चित्रपटाची निर्मिती केली.

सामाजिक चित्रपट सर्वात जास्त म्हणजे सद्दुसष्ट इतके निघाले. यातील

सत्तावीस पुणे, एकोणीस कोल्हापूर व अठरा मुंबई येथील चित्रपट संस्थांनी सादर केले. सांगलीच्या चित्रपट संस्थांनी तीन सामाजिक चित्रपटांची निर्मिती केली.

या काळात एकसष्ट धार्मिक चित्रपट निर्माण झाले. यात पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली व नासिक येथील चित्रपट संस्थांनी अनुक्रमे एकवीस, वीस, अठरा, दोन व एक धार्मिक चित्रपट निर्माण केले.

ऐतिहासिक चित्रपटात तेवीस चित्रपटांपैकी मुंबई नऊ, कोल्हापूरचे आठ, व पुण्याने सहा ऐतिहासिक चित्रपट प्रस्तुत केले. मनोरंजनात्मक चित्रपटात पुण्याने दोन, तर कोल्हापूरने एका चित्रपटाची निर्मिती केली, असे दिसून येते.

तांत्रिक विकास :

चित्रपट निर्मिती करीत असताना तांत्रिक बाजू अत्यंत महत्वाची असते. कोल्हापूरात चित्रपटाच्या तंत्राचा विकास कोणकोणत्या टप्यातून झाला, याचा आढावा घेणे येथे आवश्यक आहे. मागील प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे बाबूराव पेंटर यांनी स्वत: छायाचित्रक तयार करुन चित्रपट निर्मितीस सुरुवात केली.

चित्रपट निर्मिती करीत असताना त्यासाठी आवश्यक असणा-या प्रत्येक गोष्टीत संशोधन करण्याचे काम बाबूराव पेंटर यांनी करण्यास सुरुवात केली. छायाचित्रकाची गती स्थिर राहण्यासाठी त्यांनी गती-मापक यंत्र [स्पीड मीटर] तयार केले. अगदी प्रारंभी विजेची सोय नसल्यामुळे छपाई यंत्राचे [प्रिंटींग मशीन] तोंड आकाशाकडे करुन छपाई करावी लागे. ते यंत्रदेखील त्यांनी स्वत: तयार केले होते. [२००] चित्रफित धुणे, निगेटीव्ह तयार करणे व त्यावरुन पॉझिटीव्ह तयार करणे, या सर्व बाबी महाराष्ट्र फिल्म कंपनी च्या रसायन शाळेत होत असत. त्याचप्रमाणे त्यावेळी प्रोजेक्टर ( पडद्यावर चित्र पाडण्याचे यंत्र ) नसल्याने छायाचित्रकात पॉझिटीव्ह घालून मागील भागावर चित्रफितीवरील प्रतिबिंब पाहण्याची जी सोय होती, त्या भागावर आरशाने किरण पाडून चित्रफित पहात असत. [२०१] अशा रितीने " सैरंध्री " चित्रपटाची अनेकवेळा चांचणी घेतली जात असते. संस्थेतील यांत्रिक कामासाठी छोटासा लेथ व त्याला लागणारी साधने घेतली होती. लोहारकाम, ओतकाम या गोष्टी देखील संस्थेमध्ये होऊ लागल्या. [२०२]

देशी छायाचित्रकाच्या कांही मर्यादा असल्याने चमत्कृती दृश्ये चित्रित करण्यासाठी परदेशी छायाचित्रकाची गरज वाटू लागली. यास्तव " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " वत्सला हरण " या १९२१ च्या चित्रपटातील चमत्कृती दृश्यासाठी " बेल ॲण्ड हॅावेल कंपनी " चा छायाचित्रक परदेशाहून मागविण्यात आला. [२०३] चित्रपटातील चमत्कृती दृश्ये घेण्यासाठी याचा वापर केला गेला. उदा. वत्सलेला घेऊन आकाशातून जाणा-या घटोत्कचाचे उड्डाण दाखविण्यासाठी बाबूराव पेंटर यांनी पांढ-या स्वच्छ पडद्यावर घटोत्कचाचे काम करणा-या पात्रास टांगून छायाचित्रकाला ट्रॅालीने गती देऊन वेगवेगळी दृश्ये चित्रित केली. त्याला उंच टांगल्याने त्याच्या पोटाखालचा भाग सहज दिसत असे व तोपर्यंत उड्डाणाचे चित्रिकरण काळ्या पडद्यावर होत असते. [२०४]

चित्रिकरणास सोयीस्कर असा वजनास हलका व सुटसुटीत छायाचित्रक " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३० च्या " उदयकाल " या चित्रपटाच्यावेळी खरेदी केला. [२०५] " बेल ॲण्ड हॅावेल कंपनी " च्या या " आयमो " नावाच्या परदेशी छायाचित्रकामुळे चित्रपटातील घोडयांबरोबर घेतलेली दृश्ये अत्यंत परिणामकारक झाली. त्याचबरोबर हा छायाचित्रक वजनाला हलका असल्यामुळे हातात धरुन चित्रिकरण करणे, बाहय चित्रिकरणासाठी वेगवेगळया ठिकाणी नेणे सहज शक्य झाले.

चित्रिकरण पूर्ण झाल्यावर वेगवेगळे प्रसंग संकलित करणे आवश्यक असते. संकलनास पूर्वी जोडणे [जॅायनिंग] म्हणत. प्रारंभी चित्रफीत हाताने जोडावी लागे. पण १९३३ मध्ये व्ही. शांताराम यांनी जर्मनीहून चित्रफीत जोडण्याचे यंत्र आणले. [२०६] त्यामुळे त्या यंत्राचा वापर करुन चित्रफीत जोडली जाऊ लागली.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रारंभीच्या काळी कोल्हापूरात विजेची सोय नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत. या समस्या सोडविण्यासाठी सूर्य प्रकाशात बाह्य-चित्रण केले जाई. पण विजेच्या प्रकाशावर छायाचित्रण झाल्याने जे समाधान मिळेल ते सूर्य प्रकाशाने मिळणार नाही, या कारणास्तव " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ने चाळीस हॉर्सपॉवरचे इंजिन खरेदी केले.[२०७] या संस्थेचा १९२३ साली या संस्थेने काढलेला " सिंहगड " हा ऐतिहासिक चित्रपट म्हणजे भारतातील पहिले विजेच्या प्रकाशातील चित्रण झालेला चित्रपट होय.[२०८]

मूक चित्रपटाला कांही नैसर्गिक मर्यादा होत्या. ध्वनिमुद्रणाची सुरुवात झाली नसल्याने पात्रांच्या संवादावर मर्यादा पडत असत. पात्रांचे संवाद प्रेक्षकांना कळण्यासाठी पाट्या [टायटल्स] टाकत असत. त्यामुळे सुशिक्षित प्रेक्षकाला ते कळू शकत असत. उदा. " सैरंध्री " चित्रपटात सैरंध्री धर्मराजाला म्हणते, " परसेवा आदमीको कितनी लाचार बनती है " या वाक्याची पाटी [टायटल] दाखविली गेली.[२०९] १

बोलपटाचे तंत्र :

चित्रपटाला आवाजाची जोड मिळाल्याने, म्हणजेच बोलपटाची सुरुवात झाल्याने चित्रपटाच्या तांत्रिक विकासाचा एक महत्वाचा टप्पा गाठला गेला. भारतात १९३१ साली सर्वप्रथम निघालेल्या " आलमआरा " व इतरही बोलपटासाठी छायाचित्रकात त्यात चित्रपट्टीवर एका कडेला ध्वनिमुद्रण होत असे[२१०] या पध्दतीत ओठांच्या हालचाली आवाजा - बरोबर जमून येण्यात चूक येत नसे, पण त्याबरोबर संकलन स्वातंत्र्यावर मर्यादा पडत.

१९३२ च्या दरम्यान " प्रभात फिल्म कंपनी " ने बोलपट काढण्याचे ठरविले. त्यासाठी ध्वनिमुद्रण छायाचित्रकातच न ठेवता ते स्वतंत्र निराळे ठेवले तर चित्रण व ध्वनि या दोन स्वतंत्र पट्टया तयार होतील व दिग्दर्शन संकलनासही स्वातंत्र्य मिळेल, म्हणून ध्वनिमुद्रणाची सोय असलेले " ऑडीओ कॅमिक्स " या नावाचे ध्वनियंत्र अमेरिकेहून मागविले. [२११] या पध्दतीत ध्वनियंत्र व छायाचित्रक एकाच गतीत व एकाच वेळेत चालणारी दोन गती यंत्र [ इंटरलॉक मोटर्स ] मिळत असत.

चित्रपटात पात्रांची संभाषणे, गाणी ध्वनिमुद्रीत करण्यासाठी शांत जागा आवश्यक होती. यासाठी " प्रभात फिल्म कंपनी " ने गावाबाहेर नवीन चित्रपट निर्मितीगृह उभारले व सूर्यप्रकाश येण्यासाठी अपारदर्शक काचेचे [ग्राऊंड ग्लास] छप्पर घातले गेले. [२१२] अशा रितीने संपूर्ण पूर्व तयारी झाल्यानंतर " अयोध्येचा राजा " या बोलपटाचे चित्रिकरण करण्यास सुरूवात केली. या चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीचे देखील चित्रिकरण केले गेले. १९३२ साली " प्रभात फिल्म कंपनी " ने सदर चित्रपट दोन्ही भाषात प्रस्तुत केला. [२१३]

## रंगीत चित्रपट निर्मिती :

मूकपट, बोलपट या टप्प्यातून चित्रपटाचा विकास चालू असतानाच " प्रभात फिल्म कंपनी " ने रंगीत चित्रपटाची निर्मिती करण्याचे ठरविले. [२१४] " आग्फा " या जर्मन कंपनीने रंगीत चित्रफीत काढण्याची एक नवीन बायपॅक पध्दत शोधून काढली होती. या पध्दतीत छायाचित्रकात एकाच वेळेला निगेटिव्हजच्या दोन पट्टया चालवाव्या लागत. एक निगेटिव्ह नारिंगी रंगासाठी व दुसरी निळया रंगासाठी वापराव्या लागत. काळ्या पांढ-या निगेटिव्ह प्रमाणेच यावरही रासायनिक प्रक्रिया करावी लागे. [२१५]

" प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ साली " सैरंध्री " हा रंगीत चित्रपट काढायचे नक्की केले. अगदी सुरुवातीस चाचणी पाहण्यासाठी म्हणून थोडे चित्रिकरण करुन निगेटिव्हज्‌वर रासायनिक प्रक्रिया करुन रंगीत प्रत काढण्यास जर्मनीस पाठविल्या. [२१६] चित्रपटाचे संपूर्ण चित्रिकरण झाल्यानंतर रंगीत प्रत काढण्यासाठी प्रत्येक दृश्याचे वेगळे संकलन करुन लहान रिळे तयार केली गेली व प्रत्येक रिळाची काळी-पांढरी प्रत काढून व जोडून चित्रपटाची चाचणी घेतली गेली. चित्रपटाची रंगीत प्रत काढण्यासाठी व्ही. शांताराम स्वत: जर्मनीस गेले. [२१७] अशा रितीने १९३३ साली भारतातील पहिला रंगीत चित्रपट सादर करण्याचे श्रेय " प्रभात फिल्म कंपनी " ला जाते.

पहिली ध्वनिमुद्रीका :

नवनवीन तांत्रिक सुधारणा होत असताना चित्रपटाच्या मूळ ध्वनी-फितीवरुनच ध्वनिमुद्रीका बनविण्याची कल्पना व्ही. शांताराम यांनी सुचली. [२१८] जर्मनीच्या "सिमेन्स टेलिफंकन रेकॉर्ड कंपनी " ने " सैरंध्री " चित्रपटाच्या ध्वनिमुद्रीका काढल्या. सदर ध्वनिमुद्रीकेवर गाण्याच्या पहिल्या ओळीचे शब्द देवनागरी लिपित लिहीण्याचे ठरले. [२१९] अशा रितीने भारतीय चित्रपटांची पहिली ध्वनिमुद्रीका " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ साली " सैरंध्री " या चित्रपटाद्वारे सादर केली. यानंतर १९३७ साली " हंस पिक्चर्स " च्या " प्रेमवीर " या चित्रपटापासून मराठी चित्रपटामध्ये पार्श्वगायनाची सुरुवात झाली. [२२०]

अशा रितीने मूकपट, बोलपट, रंगीत चित्रपट हे तांत्रिक प्रगतीचे टप्पे गाठल्याने व इतर अनेक तांत्रिक शोध लावल्याने चित्रपटांचा तांत्रिक विकास मोठ्या प्रमाणात घडून आल्याचे दिसते.

संदर्भग्रंथ व तळटीपा :


१] भिडे ग. रं., बाबा गजबर, कलामहर्षि बाबूराव पेंटर, पृ. १६९.

२] कित्ता, पृ. ११९.

३] कित्ता, पृ. १२४

४] व्ही. शांताराम, शांतारामा, पृ. ५७१

५] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १३१, १३२.

६] कित्ता, पृ. १६९.

७] कित्ता, पृ. १५३.

८] कित्ता, पृ. ५८.

९] कित्ता, पृ. १४१.

१०] कित्ता, पृ. १५२.

११] कित्ता, पृ. १७०.

१२] कित्ता, पृ. १७०.

१३] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७२, ७३.

१४] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६९.

१५] कित्ता, पृ. १५५, १५६.

१६] कित्ता, पृ. १५६.

१७] कित्ता, पृ. १७०.

१८] कित्ता, पृ. १५६.

१९] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७४.

२०] भिडे ग. रं., उपरोक्त, पृ. १५४.

२१] कित्ता, पृ. १७०.

२२] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७५

२३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १३८.

२४] कित्ता, पृ. १७०.

२५] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ७५१.

२६] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.
२७] कित्ता, पृ. १७१.
२८] कित्ता, पृ. १७१.
२९] कित्ता, पृ. १५४.
३०] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.
३१] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १५८.
३२] कित्ता, पृ. १५८.
३३] कित्ता, पृ. १७१.
३४] कित्ता, पृ. १७१.
३५] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६०, १६१.
३६] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.
३७] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.
३८] कित्ता, पृ. १६३.
३९] कित्ता, पृ. १६९, १७१.
४०] कित्ता, पृ. १६४.
४१] संपा. गोविंद तळवलकर, महाराष्ट्र टाईम्स, दि. २०.८.९३, पृ. ३.
४२] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६२.
४३] कित्ता, पृ. १६२, १६४.
४४] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.
४५] कित्ता, पृ. ९२, ९३.
४६] कित्ता, पृ. ५७२.
४७] कित्ता, पृ. १०२.
४८] कित्ता, पृ. ५७२.
४९] कित्ता, पृ. ५७२.
५०] कित्ता, पृ. ५७२.
५१] कित्ता, पृ. १०८.
५२] कित्ता, पृ. ५७२.

५३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.

५४] कित्ता, पृ. १७१.

५५] कित्ता, पृ. १६६.

५६] श्री. अनंत माने यांची मुलाखत.

५७] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.

५८] कित्ता, पृ. १७१.

५९] श्री. अनंत माने यांची मुलाखत.

६०] पेंढारकर बाबूराव, चित्र आणि चरित्र, पृ. ८९.

६१] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.

६२] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.

६३] कित्ता, पृ. ६१.

६४] संपा. सुधीर फडके, चित्रशारदा, पृ. ६.

६५] संपा. वसंत साठे, चित्रसंपदा, पृ. ४१.

६६] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ४३.

६७] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७३.

६८] टेंबे गोविंदराव, माझा जीवनविहार, पृ. २७८,

६९] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ९८, १०२.

७०] सौ. लीला पेंढारकर यांची मुलाखत.

७१] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९.

७२] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७३.

७३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९.

७४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १.

७५] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ५९.

७६] संपादक वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९.

७७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १.

७८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९.

७९] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३.

८०] कित्ता, पृ. ३.

८१] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. १३७.

८२] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४.

८३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ११.

८४] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. ५७३.

८५] कित्ता, पृ. १३९.

८६] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ११.

८७] कित्ता, पृ. ११.

८८] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४.

८९] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. १३८.

९०] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ११५.

९१] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६७.

९२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ११.

९३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ४.

९४] पेंढारकर भालजी, साधा माणूस, पृ. २३७.

९५] कित्ता, पृ. ८७.

९६] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १२.

९७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ५.

९८] कित्ता, पृ. ७.

९९] श्री.वसंत वणकुद्रे यांची मुलाखत.

१००] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १३.

१०१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ७.

१०२] कित्ता, पृ. ८.

१०३] कित्ता, पृ. ८.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१०४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १२०.

१०५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १३.

१०६] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १२१, १२२.

१०७] कित्ता, पृ. १२५, १२६.

१०८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १४.

१०९] कित्ता, पृ. १४.

११०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १०.

१११] कित्ता, पृ. ११.

११२] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ५९.

११३] कित्ता, पृ. १५.

११४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ११.

११५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ११५.

११६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ११.

११७] कित्ता, पृ. १२.

११८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६.

११९] कित्ता, पृ. १६.

१२०] कित्ता, पृ. १६.

१२१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १२.

१२२] संपा. ग. रं. भिडे, पु.ल. देशपांडे, कोल्हापूर दर्शन, पृ. २२१.

१२३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६.

१२४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १३.

१२५] संपा. बाळासाहेब पाटील, साप्ता. सत्यवादी, दि. ९.२.३८, पृ. ३.

१२६] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६.

१२७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १३.

१२८] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८४.

१२९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६.

१३०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १३.

१३१] कित्ता, पृ. १४.

१३२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १७.

१३३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १४.

१३४] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ६०.

१३५] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १४२.

१३६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १४.

१३७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १७.

१३८] कित्ता, पृ. १८.

१३९] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १६.

१४०] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १४८.

१४१] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १८.

१४२] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १७.

१४३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १८.

१४४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८४.

१४५] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १७.

१४६] कित्ता, पृ. १७.

१४७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १९.

१४८] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १८.

१४९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १९.

१५०] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १९.

१५१] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १९.

१५२] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १९.

१५३] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १५२.

१५४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १९.

१५५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १९.
१५६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. १९.
१५७] संपा. दत्तात्रय जाधव, गणपतराव जाधव, दै.पुढारी, २०.५.४०, पृ. १.
१५८] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २०.
१५९] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. २०.७.३८, पृ. १३.
१६०] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १७०.
१६१] कित्ता, पृ. १७०.
१६२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २३.
१६३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २६.
१६४] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २३.
१६५] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २६.
१६६] सौ. लिला पेंढारकर यांची मुलाखत.
१६७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २४.
१६८] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २८.
१६९] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३८.
१७०] संपा. ग.रं.भिडे, पु.ल.देशपांडे, उपरोक्त, पृ. २२४.
१७१] संपा. बाळासाहेब पाटील, उपरोक्त, दि. १८.८.४३., पृ. ४.
१७२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५.
१७३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९.
१७४] कित्ता, पृ. २९.
१७५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५.
१७६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९.
१७७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५.
१७८] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३०.
१७९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २५.

१८०] कित्ता, पृ. २६.
१८१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३१.
१८२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २६.
१८३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३१.
१८४] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३९.
१८५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २६.
१८६] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३२.
१८७] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३९.
१८८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २७.
१८९] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३२.
१९०] द. स. अंबपकर यांची मुलाखत.
१९१] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३३.
१९२] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८०.
१९३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २७.
१९४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३७.
१९५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २९.
१९६] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३९.
१९७] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. ३९.
१९८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ३०.
१९९] संपा. दत्तात्रय जाधव, गणपतराव जाधव, उपरोक्त, दि. १५.५.४३, पृ. ३.
२००] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १२१.
२०१] कित्ता, पृ. १२३.
२०२] कित्ता, पृ. १२१.
२०३] कित्ता, पृ. १३५.
२०४] कित्ता, पृ. १३६.

२०५] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. १०६.

२०६] श्री. अनंत माने यांची मुलाखत.

२०७] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १४०.

२०८] कित्ता, पृ. १४१, १२४.

२०९] कित्ता, पृ. १२३.

२१०] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ११५.

२११] कित्ता, पृ. ११५.

२१२] कित्ता, पृ. ११६, ११६.

२१३] कित्ता, पृ. १२६.

२१४] कित्ता, पृ. १३९.

२१५] कित्ता, पृ. १३७.

२१६] कित्ता, पृ. १३९.

२१७] कित्ता, पृ. १४०.

२१८] कित्ता, पृ. १५०.

२१९] कित्ता, पृ. १५०.

२२०] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६.